MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष पंचविसावे / अंक ३ / मार्च २०२४

## संपादकीय

### भारतीय ज्ञान परंपरा

भारतीय समाज हा एक ज्ञानाधिष्ठित समाज आहे. या समाजाला हजारो वर्षांची ज्ञानाची परंपरा लाभली आहे. जुन्या काळातील भारतीय विद्वानांनी ज्ञानाच्या विविध क्षेत्रात भ्रमंती केली आहे. खगोलशास्त्र, धातू विज्ञान, नाट्यशास्त्र, व्याकरण, आयुर्वेद, योगशास्त्र, आहारशास्त्र अशा अनेक विषयांत भारतीय ग्रंथांमध्ये विपुल ज्ञान उपलब्ध आहे.

पारतंत्र्याच्या काळात मात्र भारतीय ज्ञान परंपरेकडे दुर्लक्ष झाले. उलट ज्ञान निर्मिती युरोपात झाली आणि युरोपियन लोकांनी ती भारतात आणली असा विचार रुजविण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यावर मात करून भारतीय लोकांच्या विचारांचे डिकॉलनायझेन (Decolonisation) होणे गरजेचे आहे. त्यासाठी भारतीय ज्ञान परंपरेचे पुनरूज्जीवन करण्याचा प्रयत्न अलीकडच्या काळात सुरू करण्यात आला आहे. या संदर्भात एक आंतरराष्ट्रीय परिषद गुजरात राज्याची राजधानी गांधीनगर येथील गुजरात केंद्रीय विद्यापीठात (Central University of Gujarat) आयोजित करण्यात आली होती. फेब्रुवारी १, २ आणि ३, २०२४ या असे तीन दिवस या परिषदेत विविध विषयांवर सांगोपांग चर्चा झाली.

परिषदेसाठी भारताच्या वेगवेगळ्या राज्यांतून विषयतज्ज्ञ आले होते. त्याचबरोबर जर्मनी, पोलंड, इंग्लंड या देशातील विचारवंत देखील आले होते. तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, विज्ञान, गणित, तंत्रज्ञान, भाषाशास्त्र अशा अनेक विषयांवर या परिषदेत चर्चा झाली. यांचे प्रमुख तीन भाग होते.

१. प्राचीन भारतीय ज्ञानाची व्याप्ती.

२. सद्यस्थितीत भारतीय ज्ञान परंपरेची उपयोगिता.

३. भारतीय ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार.

विद्या प्रसारक मंडळ ठाणे आणि प्राच्यविद्या संशोधन संस्था ठाणे यांच्यावतीने मी या परिषदेत सहभागी झालो होतो. भारताच्या श्रेष्ठ गणित परंपरेची माहिती देण्याचा प्रयत्न केला. भास्कराचार्य यांनी १२ व्या शतकात लिहिलेल्या

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

'लिलावती' या ग्रंथाची वैशिष्ट्ये मी विशद केली. 'श्लोकरूपात लिहिलेल्या या ग्रंथाचा सध्याच्या शालेय गणित अध्यापनात अनन्यसाधारण महत्त्व आहे' यावर सर्व सभासदांचे एकमत झाले.

२०१४ ला भास्कराचार्य यांच्या जन्माला ९०० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने देशात वेगवेगळ्या ठिकाणी शैक्षणिक कार्यक्रम करण्यात आले. ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाने २०१४ च्या सप्टेंबर महिन्यात एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला भारत, तसेच अमेरिका, न्यूझीलंड, जर्मनी इत्यादी देशांतील तज्ज्ञ आले होते. त्या परिषदेत सादर केलेले निवडक प्रबंध एकत्र करून 'भास्करप्रभा' (Bhaskarprabha) या नावाचे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

९०० व्या जयंतीचे औचित्य साधून मी लिलावती ग्रंथावर आधारित कृतिसत्राचे आयोजन करू लागलो. या कृतिसत्राला शालेय, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. करोना महामारीच्या कालावधीत कृतिसत्रांचे आयोजन दूरस्थ पद्धतीने करण्यात आले. याला देखील महाराष्ट्रातील शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी चांगला प्रतिसाद दिला. सध्या हिन्दी भाषिक शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासाठी 'लिलावती' वरील सत्रे हिंदी भाषेत आयोजित केली जात आहेत.

२०१४ ते २०२४ या दहा वर्षांच्या कालावधीत देशाच्या वेगवेगळ्या भागांत २०० हून जास्त कृतिसत्रांचे आयोजन करण्यात आले. त्यातून पारंपरिक ज्ञानाचा प्रसार कसा करावा या बाबत प्रत्यक्ष अनुभव प्राप्त झाला. या परिषदेत मला अनुभवांची देवाणघेवाण करता आली. जी ज्ञानाची शिदोरी आपल्या कर्तबगार पूर्वजांनी आपल्यासाठी ठेवली आहे ती पुढच्या पिढीला देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने केलेल्या प्रयत्नांना चांगले यश मिळते असे लक्षात आले आहे. असे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर करण्याची गरज आहे.

पारतंत्र्यामध्ये भारतीय ज्ञान परंपरेकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष करण्यात आले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील या बाबींकडे म्हणावे तेवढे लक्ष  देण्यात आले नाही. आता आपण नवीन शैक्षणिक धोरण राबविण्याची योजना आखत आहोत. या धोरणात भारतीय ज्ञान परंपरेला पुरेसे महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे आपली ज्ञान-परंपरा पुनरुज्जीवित होईल अशी आशा वाटते.

पारंपरिक ज्ञान समाजाच्या सर्व थरांतील लोकांना समजावे यासाठी ते स्थानिक भाषेत लिहिणे आवश्यक आहे. प्राध्यापक ना. ह. फडके यांनी असा प्रयत्न केला आहे. त्यांनी भास्कराचार्यांच्या लिलावती या ग्रंथाचे मराठीत रूपांतर केले आहे. असे प्रयत्न मोठ्या स्तरावर झाले तर यश नक्कीच मिळेल. पारंपरिक ज्ञानाचे स्थानिक भाषेत रूपांतर करण्याखेरीज ते ज्ञान सर्वसामान्य लोकांना समजेल असे सोपे करून सांगणे हे देखील आवश्यक आहे. असा प्रयत्न स्वामी तीर्थजी महाराज यांनी केला आहे. जुने वेद धुंडाळून त्यातील गणिताचा भाग त्यांनी शोधून काढला. त्यावर आधारित 'वैदिक गणित' (Vedic Mathematics) हे पुस्तक त्यांनी लिहिले. त्यामुळे वैदिक गणिताचा प्रचार होण्यास मदत झाली. अशा अनेक मार्गांनी आपण प्रयत्न करीत राहिलो तर पारंपरिक ज्ञानाचा प्रसार होऊन भारताचे 'विश्वगुरू' बनण्याचे स्वप्न साकार होईल याची खात्री वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष पंचविसावे/अंक ३/मार्च २०२४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक ९ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | ठाणे उत्सव २०२४ : एक आढावा | मकरंद मुळे | २ |
| ३) | तो कनक चंपकाचा कळा .. | विनीता तेलंग | ४ |
| ४) | ऑक्सफर्डची लायब्ररी आणि इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स | संकेत कुलकर्णी | ६ |
| ५) | कलात्मकतेच्या (तोफेच्या) तोंडी संस्कृती-संस्कार? | डॉ. अपर्णा लळिंगकर | ७ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | १० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# ठाणे उत्सव २०२४ : एक आढावा

*ठाण्याच्या एकात्मिकतेचे दर्शन घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारा 'उत्सव' म्हणून नुकत्याच साजरा झालेल्या ठाणे उत्सवाचे वर्णन करावे लागेल. या उत्सवाचा आढावा प्रस्तुत लेखात ज्येष्ठ पत्रकार श्री मकरंद मुळे यांनी घेतला आहे - संपादक*

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ठाणे शहरात उत्सव संकल्पना साकारली. 'आपल्या मर्यादा लक्षात घेऊन सर्वसामान्यांनी एकत्र यावे' यासाठी एक उत्सवी चळवळ सुरू केली. पद, प्रतिष्ठा, अधिकार, शिष्टाचार अशा चौकटीत न अडकता एक 'खुले व्यासपीठ' आकारात येत आहे. विचार, पक्ष, झेंडा, नेता या पलीकडे 'केवळ ठाणेकर' या मानसिकतेतून उत्सव रुजवला जात आहे. 'ठाणेकरांचा ठाणेकरांसाठी' असे या उत्सवाचे स्वरूप आहे.

ठाण्यातील विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्ती आयोजनात सक्रिय आहेत. आपले 'मी'पण, आपले व्यावसायिक, सामाजिक स्थान बाजूला ठेवून सामूहिकतेवर श्रद्धा असणारे एकत्र येऊन आयोजन करत आहेत. उपयुक्त, सर्व सहमतीचे वर्तुळ वाढवणारे याची बेरीज आणि गुणाकार करून 'उत्सव'चे पाऊल पुढे पडत आहे.

यंदा दिनांक १६ ते १८ फेब्रुवारी दरम्यान उत्सव २०२४ संपन्न झाला. तीन दिवसांत निरनिराळे कार्यक्रम झाले. यातून एक सकारात्मक ऊर्जा निर्माण तयार झाली आहे. साहित्य, संस्कृती, कला यातून ठाणे आणि ठाणेकर यांना समृद्ध करण्यावर भर होता. ठाण्याच्या लोकसंख्येच्या तुलनेत प्रत्यक्ष सहभागाच्या टक्केवारीपेक्षा ''उत्सव, आपला आहे'' हे वाटणाऱ्यांची वाढत जाणारी संख्या महत्त्वाची आहे. 'आपले, आपल्या गावचे' हा भाव जागवणे ही उत्सवची उपलब्धी आहे. आयोजन समिती अनाम, प्रसिद्धी झोतापासून दूर राहिली तर, माणसं पुढाकार घेतात, जोडली जातात; हे उत्सवने सिद्ध केले आहे.

कार्यक्रमांची निपुणता, व्यवसायिकता, गुणवत्ता हे जसे आवश्यक असते तसे त्यातील सर्वसमावेशकता, समान संधी देण्याचा दृष्टिकोन गरजेचा असतो. उत्सव ते करत असल्याचे दिसत आहे. किमान समान कार्यक्रमाच्या आधारे समाजाला साद घालून, विवेकी समूहाला सक्रिय करून नव्या पिढीसमोर 'संघटन में शक्ती है' हे मांडणे याला तूर्तास उत्सवने प्राधान्य दिल्याचे जाणवते. लोक-सहभागातून लोक चळवळ ही आपल्या देशाची परंपरा आहे. आपल्या समाजाचे ते सामर्थ्य आहे. काळानुरूप बदल होतो. काहीवेळा शिथिलता येते. काहीसा विसर पडतो. मात्र, ते टिकून असते. खोलवर पसरलेले असल्याने त्याला पुन्हा पालवी फुटते. उत्सव सारख्या चळवळी या त्या पालवी स्वरूपातील आहेत. आपल्या मूळ हेतूंपासून दूर गेल्या नाहीत तर, क्रमाक्रमाने फुलत जाणाऱ्या ठरतील.

---

गुलाबपाणी देणाऱ्या हातांना त्याचा सुगंध चिकटल्याशिवाय राहात नाही!

ठाणे विस्तारत आहे, पसरत आहे. भूमीपुत्र ते कॉस्मॉपॉलोटिन असे होत आहे. टांगा ते मेट्रो असे बदलत आहे. वेगवान होत आहे. बदलताना काही नव्या प्रश्नांना घेऊन येत आहे. या सगळ्यांत काही मुद्दे स्थिर असतात. काही बाबी शाश्वत असतात. मूलभूत असतात. कायमस्वरूपी दिशादर्शक असतात. असे जे सत्त्व आहे ते नेहमीच व्यक्ती आणि समाजाला उभारी आणि बळ देणारे असते. ते टिकवणे म्हणजे उत्सव असे स्वरूप हे या उपक्रमाचे यश ठरेल. याचाच एक भाग म्हणजे ठाण्याच्या एकात्मिकतेचा प्रत्यय देण्याचा उत्सव हा एक प्रयत्न आहे असे म्हणता येईल.

कला, साहित्य, संस्कृतीच्या माध्यमातून एकत्र येण्याने विधायक पद्धतीने आगामी काळात ठाण्यातील नागरी प्रश्न, स्थानिक बाबी यावर काम करता येईल. उत्सव उपक्रमाला सहकार्य करणाऱ्या ठाणे महानगरपालिका, ठाणे पोलिस-यंत्रणा आणि अन्य प्रशासकीय व्यवस्थांचे आभार. रुक्ष वाटणाऱ्या, कोरड्या दिसणाऱ्या व्यवस्था हा या उपक्रम उचलून धरून, आपल्यातील संवेदनशीलतेचा देत असलेला परिचय अभिनंदनीय आहे.

लोकमत परिष्कार म्हणजे जनमताला आकार देणे, लोकमत घडवणे, त्याला अपग्रेड करणे, प्रबोधन करणे असे आहे. एकात्म, समरस, सृजनशील असा लोकमत परिष्कार करणाऱ्या उपक्रमाचे स्वागत करून त्याच्या पालखीचे भोई होणे हा ठाण्याचा स्वभाव आहे. म्हणूनच रोजच्या जगण्याच्या संघर्षाशी दोन हात करणारे ठाणेकर 'उत्सवी' आहेतच.

**– मकरंद मुळे**
ब्राह्मण सोसायटी, ठाणे
संपर्क : ८१०८० ००५६४

•••

## शेतात माझ्या...

शेतात माझ्या...
पक्षी करती किलबिलाट
साद घालतो बैलांच्या गळ्यांतील खुळखुळाट ।।

शेतात माझ्या...
कोकिळ गातो मंजुळ गाणी
पिकांच्या दिशेने वाहते झुळझुळ पाणी ।।

शेतात माझ्या...
डौलदार उभे असे देवाघरचे लेणे
नुसते पीक नसे ते, डोळ्यांचे पारणे ।।

शेतात माझ्या...
मध्येच कोंबड्याची बांग साद घालते
त्यावरून जणू बळी राजाला वेळच कळते ।।

शेतात माझ्या...
काळ्या आईने दिले भरभरून वरदान
राष्ट्रहितासाठी ती ही देते योगदान ।।

शेतात माझ्या...
वारा जणू सर्वांची परीक्षाच घेतो
शेतकरी त्यावरून हवामानाचा अंदाज लावतो ।।

शेतात माझ्या...
पाठीशी उभा होळकरांचा इंद्रायणी किल्ला
जणू हिंमतच देतो बळीराजाला ।।

शेतात माझ्या...
यंत्र युगाला नाही थारा वारा
कष्ट कऱ्यांचा हा परिसर सारा ।।

शेतात माझ्या...
रोजच असे संगीतरूपी जगणे
यालाच म्हणावे का निसर्गाचे देणे ।।

शेतात माझ्या...
राबतो शेतकरी देण्या अन्न तुम्हा दिवस-रात्र
लक्षात राहू द्या ही गोष्ट न विसरता मात्र! ।।

**अविनाश पवार,** सहाय्यक प्राध्यापक
महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

# ती कनक चंपकाचा कळा ..

*भगवंताच्या रूपाचे अत्यंत मार्मिक वर्णन करणारा ज्येष्ठ संत साहित्य अभ्यासिका विनिता तेलंग यांचा वेगळ्या धाटणीचा लेख - संपादक*



बाबूजी जेव्हा गीत रामायणाचे कार्यक्रम करत तेव्हा अगदी मोजकं आणि समर्पक असं निवेदन ते स्वतःच करत. त्यात रामजन्माच्या गीताच्या आधी ते म्हणायचे, '...नगरजनांचा आनंद तर नुसता भरून ओसंडत होता. श्रीरामादिक भावंडे रंगू लागली, तरीही अयोध्येतील स्त्रिया श्रीरामजन्माचे आनंद-गीत गात होत्या..पुन्हा पुन्हा गात होत्या, आळवून आळवून गात होत्या!'

तशी अवस्था झाली आहे. तो प्रसंग, त्यावेळी दाटून आलेला कंठ, भरलेले डोळे, आणि स्वप्नवत वाटावा असा तो प्राणप्रतिष्ठेचा अनुपम सोहळा, सारं पुन्हा पुन्हा आठवावं, अनुभवावं असं वाटत आहे.

वेगवेगळ्या माध्यमांतून ती गोजिरवाणी श्रीमूर्ती डोळ्यांसमोर येते आणि दरवेळी नव्यानं त्यातलं सौंदर्य, माधुर्य आणि कौमार्य जाणवतं आहे.

काल बेळगावला तिथल्या जोतिबाच्या मंदिरात दर्शनाला गेलो. तिथे जोतिबाही श्रीरामाच्या कोदंडधारी रुपात उभा! जिथे तिथे तोच दिसतो आहे सध्या! दिवसागणिक त्या गोजिऱ्या रूपाची मोहिनी वाढत चालली, आणि त्या रूपाचं वर्णन करायला आपले शब्द थिटे पडत आहेत, ही अस्वस्थताही. पण दुसऱ्या एका बालयोग्याच्या नितांत सुंदर सुकुमार शब्दकळेत त्या रूपाचं नेमकं वर्णन सापडलं.

ज्ञानेश्वरीत माउली वर्णन करत असतात कुंडलिनी जागृत झालेल्या योग्याचं, पण डोळ्यांसमोर येतोय तो अयोध्यावासी बालराम!

आणि का नाही यायचा! तो स्वतः योगिराज. श्रीराम नावातच अर्थ दडलाय की, योग्यांचे चित्त ज्याच्यात रममाण होते असा तो. मग त्याची मूर्ती सर्व योग लक्षणांनी युक्त अशीच असायची. आणि त्या अनुपमेय मूर्तीला घडवणारे हातही 'योगिराजा'चे! त्यामुळेच तर एका निराकार शिलाखंडातून ही सारी लक्षणं प्रकट झाली.. ही मूर्ती पाषाणाची नव्हेच..

निर्दोष, निर्मळ, शुद्ध स्फटिकासारखा परिपूर्ण गाभा. त्याला फुटलेले अवयव असे कांतिमान की जणू आत रत्नाचे बीज रुजले आहे नि त्याचे कोवळे लालस कोंभ बाहेर डोकावत आहेत..

मग काश्मीरीचें स्वयंभ। कां रत्नबीजा निघाले कोंभ।
अवयव कांतीची भांब। तैसी दिसे।।

त्या मुखमंडलाचं तेज तरी किती! सायंकालीन नभाकडून रंग आणून ते ओतले आहेत, की त्याच्या अंतस्थ चैतन्याचीच ही प्रभा आहे ?

नातरी संध्यारागींचे रंग। काढून वळिलें तें आंग।
की अंतर्ज्योतीचें लिंग। निर्वाळिलें।।

कुंकुमार्चन केल्यासारखी ही प्रसन्न मूर्ती पाहून वाटते की, योग्यांना प्राप्त झालेली सिद्धी ओतून ही बनवली आहे. त्यामुळे साक्षात शान्तीच स-अवयव उभी ठाकली आहे.

कुंकुमाचें भरीव। सिद्धरसाचें वोतीव।
मज पाहतां सावेव। शांतिचि ते।।

ते रूप पाहून आनंदाचं भरतं येतं आणि वाटतं, आमच्या आनंदचित्रात सुरम्य रंग भरले जात आहेत. ही मूर्ती म्हणजे साक्षात महासुखाचे रूप आहे. एक संतोषरूपी तरू सर्वत्र फोफावला आहे.

ते आनंदचित्रींचे लेप। नातरी महासुखाचें रूप।
की संतोषतरूचें रोप। थांवलें जैसें।।

याचे रूप पाहून वाटते की, हा उमलू लागलेला सोनचाफ्याचा देखणा कळा! जणू अमृताचा पुतळाच असावा असा गोडवा यात ओतप्रोत भरला आहे. कोवळेपणाचा मळा भरभरून फुलावा अशी कोमलता त्याच्या सर्वांगात दाटली आहे!

तो कनकचंपकाचा कळा। कीं अमृताचा पुतळा।
नाना सासिंनला मळा। कोंवळिकेचा।।

शरद ऋतूचा ओलावा मिळाल्यामुळे चंद्राला पालवी फुटावी, किंवा मूर्तीमंत तेजच साक्षात आसनावर उपस्थित व्हावे, असे हे रुपडे!

हो कां जे शारदियेचेनि वोलें। चंद्रबिंब पाल्हेलें।
का तेजचि मूर्त बैसलें। आसनावरी।।

याच्या हाता-पायाचे तळवे तर असे देखणे की, त्यांना पाहून तांबड्या कमळांची आठवण येते. आणि ते नुकतेच शुचिर्भूत होऊन आल्यासारखे निर्मळ डोळे.. त्याचा नितळपणा वर्णावा तरी कसा!

करचरणतळें। जैसीं कां रातोत्पळें।
पाखाळींव होती डोळे। काय सांगों।।

शिंपल्यातले मोती जेव्हा पक्व होतात तेव्हा ते मोत्याच्या संपुटात मावेनासे होतात. मग त्या शिंपेची तटतटलेली शिवण उसवते..

निडाराचेनि कोंदाटें। मोतियें नावरती संपुटें।
मग शिवणी जैसी उतटे। शुक्तिपल्लवांची।।

तशीच त्याची दृष्टी आता त्याच्या डोळ्यांच्या संपुटात मावत नसल्यामुळे ती आवेगाने बाहेर पडू पाहते आहे. त्या डोळ्यांच्या पाकळ्या अर्ध्या उमलतात तोच त्या गगनाला गवसणी घालू पाहात आहेत.

तैसी पातियांचिये कवळिये न समाये। दिठी जाकळोनि निघों पाहे। आधिलीचि परी होये। गगना कवळिती।।

ती मूर्ती अशी भासते की, जणू प्रत्यक्ष परब्रह्मच रसरूपाने मनुष्याकृती साच्यात ओतले आहे!

परब्रह्माचेनि रसें। देहाकृतीचियेनी मुसें।
वोतींव जाहले तैसें। दिसती आंगे।।

आणि गंमत म्हणजे वयाच्या हिशेबाने पाहिले तर तो बालकासारखा वाटतो, पण त्याचे सामर्थ्य आणि धैर्य असे असते की, त्याला 'बाळ' हे विशेषण न वापरता 'बळ' हे विशेषण वापरणे शोभेल !

वयसा तरी येतुलेवरी। एऱ्हवीं बाळाचा बळार्थु करी। धैर्याची थोरी। निरुपमु।। असे हे आनंदनिधान!

सगळ्या विश्वाला आनंद देण्याकरता तिथे येऊन सानंद, सहर्ष, साक्षात उभे आहे.

आता त्यास्थानी दुसरे काही होऊच शकत नाही.. कारण तिथे जे उभे आहे तेच आहे समस्त विश्वाचे मूळ, योग्यांच्या साधनेचे फळ, अंतर्बाह्य केवळ आनंद असलेले मूर्तिमंत चैतन्य!

जे विश्वाचें मूळ।जे योगद्रुमाचें फळ। जें आनंदाचें केवळ। चैतन्य गा।।

..असं ज्याचं वर्णन होऊ शकतं असं रूप आपल्या समोर साक्षात साकार झालं आहे, या रूपाचं वर्णन यानेच होऊ शकतं असे माउलींचे शब्द आपल्यासोबत आहेत, अजून भाग्य ते काय ?

**– विनीता तेलंग**
संत साहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासिका, मुंबई

●●●

तुम्ही जेवढं इतरांना द्याल, तेवढंच किंबहुना त्याच्या कित्येक पटीने देव तुम्हाला देईल...


# ऑक्सफर्डची लायब्ररी आणि इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स

*'ग्रंथालय कशी चालवली पाहिजेत व ग्रंथपाल कसा असला पाहिजे?' या संदर्भात ऑक्सफर्डच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना लंडनमधील इतिहासाचे अभ्यासक श्री संकेत कुलकर्णी यांनी प्रस्तुत लेखात मांडली आहे : संपादक*

ही गोष्ट आहे डिसेंबर १६४५ मधली. इंग्लंडमध्ये ऑलिव्हर क्रॉमवेल आणि राजा पहिला चार्ल्स ह्यांच्यामध्ये यादवी सुरू होती. चार्ल्स सैन्य घेऊन ऑक्सफ़र्डजवळ मुक्काम ठोकून होता. डिसेंबर महिना असल्याने कडाक्याची थंडी होती. त्यामुळे युद्धाची धामधुमी जरा कमी झाली होती. थोडा रिकामा वेळ असल्याने (आणि बहुतेक बाकी काही 'करण्यासारखे' नसल्याने!) चार्ल्सला फ्रेंच कवितांचे एक पुस्तक वाचावेसे वाटले. Agrippa d'Aubign नावाच्या कवीचे 'Histoire Universelle' हे ते पुस्तक.

जवळच ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी होती. (हिची स्थापना १०९६ ची - म्हणजे संत ज्ञानेश्वरांच्या २०० वर्षे आधी!) खास नियम बनवून ह्या ऑक्सफ़र्डची लायब्ररी १६०२ मध्येच आम जनतेला वाचनासाठी खुली करून दिलेली होती. चार्ल्सने लगेच कागद घेतला आणि त्यावर लिहिले की, 'त्याला स्वत:ला Histoire Universelle हे Agrippa d'Aubign ह्या कवीने लिहीलेले पुस्तक हवेय. एका माणसाकरवी त्याने हे पत्र युनिव्हर्सिटीचा व्हाईस चॅन्सेलर सॅम्युएल फेल ह्याला पाठवून दिले. सॅम्युएल फेलने त्याच कागदावर 'राजाला हे पुस्तक देण्यात यावे' असे लिहिले आणि चार्ल्सच्या माणसाला पुढे लायब्रेरीयनकडे पाठवून दिले. त्यावेळी ऑक्सफ़र्डचा लायब्रेरीयन होता जॉन राऊस नावाचा एक साधा माणूस. राऊसने ही चिठ्ठी वाचली आणि चिठ्ठी घेऊन आलेल्या चार्ल्सच्या माणसाला ठणकावून सांगितले की, 'लायब्ररीच्या नियमांनुसार कोणतेही पुस्तक कोणालाही लायब्ररीबाहेर वाचायला घेऊन जायची परवानगी नाही. राजेसाहेबांना पुस्तक वाचायचे असेल तर त्यांना इथे लायब्रेरीच्या रीडर्स रूममध्ये येऊन वाचायला सांगावे. मी पुस्तक काढून ठेवतो!'

वरवर पाहता ही क्षुल्लक घटना वाटते. पण एक साधा लायब्रेरीयन राजाची नियमबाह्य विनंती पाळायला नकार देतो - जेथे प्रत्यक्ष राजाचा आणि संस्थेच्या व्हाईस चॅन्सेलरचा लिखित हुकूम होता, तेथे हा माणूस ती संस्था ह्या दोघांपेक्षा मोठी आणि कोणीही संस्थेच्या नियमांच्या 'वर' नाही हे कृतीतून दाखवून देतो - म्हणून राऊसचे कौतुक! आणि ह्याहीपुढे जाऊन सत्ताधारी



राजा चार्ल्स व व्हाईस चॅन्सेलर फेलचे हस्ताक्षर असलेला हा कागद. ह्या कागदावर हे लिहिलेले आहे.

December 30. 1645.

Deliver unto the bearer hereof, for the present use of his Maiesty, a booke intituled Histoire Universelle du Sieur D'Aubigné: and this shall be your warrant:

His maiestyes use: is in commaund to use
S Fell Vice Can.

(पृष्ठ क्र. ९ वर)

# कलात्मकतेच्या (तोफेच्या) तोंडी संस्कृती-संस्कार?

*एकूणच अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या व कलात्मकतेच्या निशाण्यावर संस्कृती व संस्कार आल्याचे निरीक्षण प्रस्तुत लेखात केलेले आहे. नुकत्याच पुणे विद्यापीठात झालेल्या रामायणातील पात्रांच्या विकृत प्रदर्शनाची याला किनार आहे : संपादक*

शुक्रवार दिनांक २ फेब्रुवारी २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललितकला केंद्रात चालू असलेल्या अंतर्गत प्रात्यक्षिक परीक्षेत दाखवत असलेल्या प्रहसनांत रामायण, रामलीला, यांतील थोडा मजकूर आणि प्रभू राम, सीतामाई, हनुमान, लक्ष्मण या व्यक्तीरेखा वापरून बॅकस्टेज आर्टीस्टचा विडंबनात्मक उपहास हा अश्लील भाषा, आक्षेपार्ह वर्तनाच्या माध्यमातून दाखवण्यात आला. त्यावेळी जमलेल्या प्रेक्षकांमधून प्रहसन चालू असताना हुल्लडबाजी दिसून आली आणि या सगळ्यावर अभाविपने संतापजनक प्रतिक्रिया देत प्रहसन थांबविले. याप्रसंगी झालेल्या बाचाबाची आणि हाणामारीत दोनही बाजूच्या विद्यार्थ्यांना मार बसला. ललितकलाचे विभागप्रमुख आणि तीन परीक्षक त्यावेळी तिथे उपस्थित होते. विभाग प्रमुखांनी या सगळ्या प्रकाराचे जाहीर समर्थन करत आक्षेप घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीव्र विरोध दर्शविला. यातून विभागप्रमुख देखील रामायण आणि त्यातील देवदेवतांच्या विडंबनात्मक उपहासात सामील होते असे दिसून येते. यानंतर दाखल केलेल्या एफ आय आर नंतर ललितकलाचे विभाग प्रमुख आणि प्रहसनात सहभागी पाच विद्यार्थी (संहिता लेखक, दिग्दर्शक, राम, सीता, लक्ष्मण इ. व्यक्तीरेखा साकारणारे नट) अशा सहा जणांना अटक झाली. नंतर प्रत्येकी रुपये ५०,०००/- आणि आठवड्यातून दोन वेळा चतुश्रृंगी पोलिस स्टेशनला हजेरी यावर त्यांना जामीन मिळाला. विद्यापीठाने घडल्या प्रकाराची सखोल चौकशी करण्यासाठी सात जणांची सत्यशोधन समिती गठीत केलेली आहे. त्या समितीची पहिली बैठक बुधवारी पार पडली.

या सगळ्या प्रकारानंतर दोनही बाजूंनी सर्वत्र धुरळा उडाला. प्राध्यापकांनी विभाग प्रमुखांच्या अटकेचा तीव्र निषेध नोंदवला. त्यांचे म्हणणे असे की, ‘अशी कारवाई आवारात करण्यास विद्यापीठाने नकार द्यावयास हवा होता. ही आमच्या सेवा सुरक्षा नियमावली विरुद्ध आहे इ. चुका लहान मुलांकडून घडल्या तरी त्यांना माफ करावयास हवे. प्रहसनात काही आक्षेप घेण्यासारखं असलं तरी ते पूर्ण पाहून मगच त्यावर आक्षेप नोंदवायला हवा होता इ.’ प्रतिक्रिया प्राध्यापकांकडून आल्या. मुळात जर अंतर्गत प्रात्यक्षिक परीक्षा होती तर फक्त डिपार्टमेंटच्या विद्यार्थ्यांनाच बोलवावे. इतर प्रेक्षकांना बोलावण्याची गरज नसते असे ज्येष्ठ रंगकर्मी विजय गोखले, तसेच अभिनेता, दिग्दर्शक मिलींद शिंत्रे यांनी मत व्यक्त केले. बरं ज्यांनी संहितेमध्ये ‘भ’ आणि ‘म’ वरूनच्या शिव्या सीतेची व्यक्तीरेखा करणाऱ्या अभिनेत्याच्या तोंडी घातल्या, ज्या दिग्दर्शकाने सीतेच्या वेषातील अभिनेत्याच्या तोंडात सिगरेट आणि लक्ष्मणाच्या वेषातील अभिनेत्याने ती लायटरने शिलगावणे घातले ते लहान-लहान मुले नक्कीच नाहीत.

समजा असं गृहित धरलं की, ती मुलं ‘इनोसंट’ आहेत, पण अशा प्रकारच्या परफॉर्मिंग आर्ट्सच्या सादरीकरणाआधी एक स्टँडर्ड प्रक्रिया फॉलो केली जाते. त्यात या मुलांना एक ‘मेन्टॉर’ दिलेला असतो. ‘मेन्टॉर’ ने या मुलांना परफॉर्मिंग आर्ट्स मधील विडंबन आणि विकृती, विनोद आणि उपहास, तसेच नैतिक आणि अनैतिकता यांच्यातील फरक स्पष्ट करून सांगणे गरजेचे आहे; जे इथे झालेले दिसत नाही. साधारणपणे ‘ॲकॅडमिक’ विषयांची परीक्षा आणि अशा ‘परफॉर्मिंग

आर्ट्स' ची परीक्षा यातील फरक नीट समजून घ्यावयास हवा. 'अॅकॅडमिक्स'च्या विषयांमध्ये 'कंटेंट' ठरलेला असतो. विद्यार्थी अभ्यास करून परीक्षा देतात आणि त्यांना गुण दिले जातात. यात प्रश्नपत्रिका हातात पडल्यावर प्राध्यापक मुलांना मार्गदर्शन करत नसतात. 'परफॉर्मिंग आर्ट्स' मध्ये बरोबर उलट प्रोसेस आहे. प्रश्नपत्रिका माहिती असते. ते बसविण्यासाठी 'मेन्टॉर' प्राध्यापकांची मदत घेणे अपेक्षित असते. त्यामुळे 'कंटेंट' सादर करताना तो अश्लील नसणे, त्यात आक्षेपार्ह भाषा, आक्षेपार्ह देहबोली वापरली जाऊ न देणे हे मेंटॉर्सच्या, संहिता लेखकाच्या, दिग्दर्शकांच्या, अभिनेत्यांच्या हातात असते. असे मुद्दे गोखले, शिंत्रे यांच्याशी बोलल्यानंतर लक्षात आले.

'एनएसडी'च्या अॅकॅडमिक काउन्सीलचे सदस्य विजय केंकरे यांनी प्रहसन पूर्ण न पाहता अर्ध्यावरच थांबवण्यावर आक्षेप घेतला. तसेच त्यांनी आक्षेपार्ह, अश्लील भाषा कलेचा भाग आहे याचे समर्थन करताना 'संगीत वस्त्रहरण', 'सखाराम बाईंडर' यांसारख्या नाटकांचा संदर्भ सांगितला. मला केंकरे यांना सांगावंसं वाटतंय की, एखादा गुन्हा घडताना तो पूर्ण घडू द्यावा आणि मग त्या गुन्ह्याची चौकशी करावी किंवा कारवाई करावी असे अपेक्षित नसते. ललितकलांतील हा प्रकार बहुसंख्य हिंदूंच्या श्रद्धास्थानांचा अपमान जाणीवपूर्वक करण्याचा प्रकार होता. हे मी पुढील मुद्यांच्या माध्यमातून स्पष्ट करतेय. विजय गोखले यांनी स्पष्ट केले की, कलेच्या माध्यमातून एखाद्या गोष्टीचा फील तयार करणे अपेक्षित असते ना की प्रत्यक्ष त्या गोष्टी दाखविणे. त्याच बरोबर जेव्हा 'ऑन स्टेज' आणि 'बॅक स्टेज' असं दोनही एकाच प्रयोगात दाखवत असताना त्यातील फरक हा अतिशय स्पष्टपणे संवाद, प्रकाशयोजना आणि व्यक्तीरेखेच्या वागणुकीतील बदलाने दाखवता येतो असे ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे यांनी सांगितले. 'वस्त्रहरण'मध्ये जरी द्रौपदीची व्यक्तिरेखा करणारा स्टेजवर सिगरेट फुंकताना दाखवला असला तरी कोणत्याही अंगाने तो द्रौपदी वाटत नाही तर 'बॅक स्टेज आर्टीस्ट' बंड्याच वाटतो. शिंत्रे यांनी त्यांचे स्वत:चे 'मोरुची मावशी' या नाटकातील व्यक्तीरेखा साकारतानाचा अनुभव सांगतानाही हेच मत व्यक्त केले. ते म्हणाले की, 'हे सगळं स्पष्टपणे बसवणं हे दिग्दर्शकाचं काम असतं.' ललितकलाच्या केसमध्ये जर दिग्दर्शक शिकाऊ आहे असं जरी म्हटलं तरी 'मेंटॉर' तेवढ्याचसाठी दिलेला असतो असं या तिघांचंही म्हणणं पडलं. त्यामुळे ललितकला केंद्रातील ते प्रहसन हा जाणीवपूर्वक उसकविण्यासाठी केलेला प्रकार होता हे दिसून येत आहे.

प्रसिद्ध अभिनेते अभिराम भडकमकर या विषयी बोलताना म्हणतात की, 'अभिव्यक्ती हे बौद्धिक मूल्य आहे. विचारांच्या बैठकीचं ते अधिष्ठान आहे. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यासोबत एक जबाबदारीही येते. नव्या पिढीला शिक्षणातून हे भान देणे जसे अभिप्रेत असते, तसेच कलात्मकतेतील मूल्यभानही महत्त्वाचे असते याचे ज्ञान देणेही... देवदेवतांना मनुष्य पातळीवर आणण्याची वैचारिक समृद्धी असलेल्या या समाजाने देवांचे विडंबन प्रहसन अगदी निखळ थट्टाही सामावून घेतली आहे. पण हाच समाज अतिसंवेदनशील होत चालला आहे असे म्हणताना त्याची बीजे सिलेक्टिव्ह, पक्षपाती व असहिष्णू होत गेलेल्या आविष्कार स्वातंत्र्याच्या संकल्पनेत आहेत का ह्याचाही विचार व्हायला हवा. परवाची प्रतिक्रिया हा या समाजाचा स्थायीभाव नसून तात्कालीक उद्वेग आहे. तो स्थायीभाव होऊ न देणे ही आपणा सर्व रंगाकर्मींचीच जबाबदारी आहे. प्रत्येक घटनेत भांडवल करण्याची संधी शोधणाऱ्या कुठल्याही व्यक्ती व संस्थांच्या हातात हा प्रश्न सोपवण्याचा मोह टाळून, पुन्हा एकदा कलात्मकता, आविष्कार, अभिव्यक्ती, स्वातंत्र्य आणि मुक्त अवकाश यांच्या व्याख्या परस्पर संवादाने घासून घेण्याची तीव्र आवश्यकता आहे.'

कलेच्या नावाखाली अशा प्रकारचा स्वैराचार समाजाने कधीच स्वीकारू नये असे माझे मत आहे. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात पुण्यातीलच एका

प्रथितयश शाळेत ७ वीच्या वर्गातील मुलांनी (को-एज्युकेशनचा वर्ग) दोन शिक्षक येण्याच्या मधल्या कालावधीत वर्गातीलच एका मुलाला बाकावर झोपवून त्याच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. त्या घटनेत त्या वर्गातील ३-४ मुले जरी सहभागी असली तरी बाकीचा वर्ग ते सगळं उभं राहून पहात होता. या मुलांच्या तोंडात अत्यंत अश्लील भाषा होती. आता हे सगळं एक्सपोजर या मुलांना कुठून मिळालं? ज्या मुलावर अत्याचाराचा प्रयत्न केला गेला त्याच्या मानसिक अवस्थेचं, ट्रॉमाचं काय?, ज्या मुलांनी हा सगळा प्रकार पाहिला त्यांच्या मनांवर काय परिणाम झाला? ज्या मुलांनी हे केलं त्यांची मानसिक परिस्थिती काय होती? आपण जे कृत्य करतो आहोत ते चुकीचं आहे याची जाणीव असेल का त्यांना? प्रश्न उत्पन्न होतो त्या मुलांनी हे का केलं असावं? हे असले प्रसंग अनेक शाळांत घडत आहेत; पण बाहेर येत नाहीत. त्या शाळेतील अत्याचारित मुलाच्या पालकांनी विषय लावून धरला आणि सी सी टीव्ही फूटेज उपलब्ध झालं म्हणून ते प्रकरण बाहेर आलं आणि संबंधित मुलांवर कारवाई झाली. पण मूळ प्रश्न तसाच आहे. या अशा प्रकरणांच्या मुळाशी विद्यार्थी दशेत किंवा पौगंडावस्थेत विद्यार्थ्यांच्या हातात मिळालेले मोबाईल, टीव्ही, ओटीटी प्लॅटफॉर्म्स आणि त्यात ते बघत असलेला कंटेंट आहे. नाहीतर असभ्य भाषा, अश्लील वर्तन आणि शिव्या हे या मुलांना घरी शिकवलं गेलं का? इथे कंटेंट कुठून येतोय? मनोरंजन क्षेत्राकडून. मनोरंजनाच्या, कलेच्या लिबर्टीच्या नावाखाली काय वाट्टेल ते दाखवणार आणि ते जनता बघणार! या सगळ्यावर तारतम्याचाच अंकुश हवा. नाहीतर कलात्मकतेच्या (तोफेच्या) तोंडी संस्कृती, संस्कार, मूल्यव्यवस्था दिल्यासारखे होईल आणि कालांतराने हे सगळं नष्ट होईल.

**– डॉ. अपर्णा लळिंगकर**
अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
संपर्क : ९७४२० ४५७८५

(पृष्ठ क्र. ६ वरून – **ऑक्सफर्डची लायब्ररी आणि इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स**)



**जॉन राऊस     इंग्लडचा राजा पहिला चार्ल्स**

असून त्याला कोणत्याही प्रकारची शिक्षा व त्रास न देणाऱ्या राजा चार्ल्सचे ह्याहून जास्त कौतुक! नियमांपुढे सगळे सारखे – अगदी राजाही ते मोडू शकत नाही – आणि राजाही हे कोणताही धाकदपटशा न दाखवता मान्य करतो – 'कायद्याचे राज्य' अजून काय वेगळे असते?

ह्या घटनेला बरीच प्रसिद्धी मिळाली. १६४६ मध्ये सुप्रसिद्ध इंग्लिश कवी मिल्टनने त्याची सर्व पुस्तके ऑक्सफ़र्ड लायब्ररीला पाठवून दिली. राऊसला एक कौतुकपर पत्रही लिहिले. पुढे १६६० मध्ये आणि १६८३ मध्ये मिल्टनच्या विचारांशी इंग्लंडच्या पार्लमेंटचे वितुष्ट आल्याने पार्लमेंटने मिल्टनची पुस्तके जाळून टाकायची विनंती ऑक्सफ़र्ड लायब्ररीला केली. ह्याच्याविरुद्ध ते कोर्टात खटला लढले आणि नियमबाह्य ठरवून दोन्ही वेळेला ही पुस्तके जाळण्याची विनंती फेटाळून लावली. ऑक्सफ़र्डच्या लायब्ररीत आजही मिल्टनची ती सर्व पुस्तके आणि त्याने राऊसला लिहिलेले ते पत्र व्यवस्थित जपून ठेवलेले आहे!

इंग्लंडमधल्या ब्रिटिश लायब्ररीसारख्या मोठ्या लायब्ऱ्या आजही कोणतेही पुस्तक कोणालाही लायब्ररीच्या बाहेर किंवा घरी घेऊन जाऊ देत नाहीत. आणि १६४५ च्या ह्या घटनेनंतर अगदी आजतागायत इंग्लंडच्या राजघराण्यातील लोकांनी लायब्ररीतून राजवाड्यांत पुस्तके 'ऑर्डर' केलेली नाहीत!

**– संकेत कुलकर्णी**
लंडन

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- दि. २९/११/२०२४ रोजी ठाणा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी इ. ५, ७, ९ वी च्या विद्यार्थ्यांना 'सायबर सुरक्षा' संदर्भात माहिती सांगितली.

- इंडियन स्वच्छता लीग अंतर्गत ठाणे महानगर पालिकेद्वारे वेस्ट टू बेस्ट स्पर्धेचे आयोजन दि. १७/९/२०२३ रोजी दादोजी स्टेडियम येथे करण्यात आले होते. आपल्या शाळेतील तयार केलेल्या प्रतीकृतीला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. सहभागी विद्यार्थी श्लोक कापरे, पूर्वा झगडे, सिद्धी पवार, श्रावणी गाडगे यांना मार्गदर्शन संजय दिघे यांनी केले.




- **स्कूल संसद स्पर्धा, पुणे –** दि.११ डिसेंबर २०२३ रोजी स्कूल संसद स्पर्धेची प्राथमिक फेरी दिनांक १० डिसेंबर २०२३ रोजी एम. एच. स्कूल येथे पार पडली. गीतेश पाटीलने पंतप्रधानांच्या भूमिकेत अतिशय आत्मविश्वासाने प्रश्नांची उत्तरे दिली. शिक्षक समन्वयक साक्षी दातार यांनी उत्तरे दिले.

- SCERT तर्फे जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत १२ वर्षे, तसेच २४ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या खालील शिक्षकांचे वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाले.

| वरिष्ठ श्रेणी | निवड श्रेणी |
|---|---|
| सौ. बोरुळकर सुप्रिया शंकर | सौ. बोऱ्हाडे सुषमा प्रकाश |
| सौ. ठिगळे वर्षा शमुवेल | सौ. धनगर यामिनी विनोद |
| श्री. कोल्हे अविनाश उत्तम | सौ. माने सुमिता दिलीप |
| श्री. देशमुख मुकुंद रमेश | श्री. जाधव जीवन नरसिंगराव |
| श्री. देसले मनोज मालू | श्री. बन्ने बसवराज सोमन्ना |
| श्री. दिघे संजय नामदेव | सौ. देवघरे पूनम राजेंद्र |
| श्री. वैद्य वासुदेव दाजीबा | |

- महाराष्ट्र नेवल NCC मुंबई 'ब' तर्फे डॉन बॉक्सो हायस्कूल, माटुंगा दि. १४/१/२०२४ रोजी 'अ' प्रमाणपत्र परीक्षा लेखी आणि प्रात्यक्षिक घेण्यात आले. त्यामध्ये आपल्या शाळेतील १९ कॅडेट सहभागी होते.

- दिनांक ८ जानेवारी २०२४ ते १३ जानेवारी २०२४ या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी विविध विषय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. खालील विषय-तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

| दिनांक | विषय | वक्ता |
|---|---|---|
| ८/१/२०२४ | मराठी | डॉ.सौ. प्रतीक्षा प्रसाद बोर्डे |
| ९/१/२०२४ | इंग्रजी | श्री. मनोहर रामदास पाटकर |
| १०/१/२०२४ | हिंदी | श्री. राजेश श्यामराव आखडमल |
| १०/१/२०२४ | संस्कृत | श्री. संजना संजय खानविलकर |
| ११/१/२०२४ | गणित | श्री. निशिकांत कुलकर्णी |
| १२/१/२०२४ | समाजशास्त्र | श्री. विजय लोटन पाटील |
| १३/१/२०२४ | विज्ञान | श्री. धोंडीराम हेगन वीरकर |

मोठ्या लोकांचा मत्सर करू नका; कारण त्यामुळे तुमचा क्षुद्रपणा प्रकट होतो!

● विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचाल सुलभ व्हावी या करिता मार्गदर्शन करण्यात आले. के.जी. जोशी कॉलेज ऑफ आर्टसच्या उप-प्राचार्य सौ. छाया कोरे व एन. जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्सच्या विभाग प्रमुख सौ. माधवी जोशी यांना निमंत्रित केले होते. मुलांना 'टक्केवारीचे महत्त्व व विविध शाखांतील संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच विद्या प्रसारक मंडळाचे पॉलीटेक्निक विभागाच्या सिलेक्शन ग्रेड लेक्चरर डॉ. गीताली इंगवले, सिनियर लेक्चरर स्मिता खंडागळे, MSCIT समन्वयक सौ. शीला आसवले यांनीही शाळेत येऊन मुलांना त्या त्या विषयातील संधींची माहिती दिली.

● शुक्रवार दि १६/२/२४ रोजी वार्षिक विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. विज्ञान, गणित, चित्रकला व हस्तकला इ. विषयांचाही समावेश होता. या प्रदर्शनाचे उदघाटन मा.सौ. श्रुती आनंद बेडेकर, आहारतज्ज्ञ, यांच्या हस्ते झाले. सदर प्रदर्शनास विद्यार्थी, पालक उपस्थित होते.







● दि १९/२/२४ रोजी नवी दिल्ली येथे लोकसभा मा. अध्यक्ष ओम बिर्ला साहेब यांच्या हस्ते शाळेतील शिक्षिका सौ. साधना कारंडे जोशी यांच्या 'बाज वडरो' या पुस्तकाचे प्रकाशन झाले त्याबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.



● दि २१ जानेवारी रोजी झालेल्या होमी भाभा बाल वैज्ञानिक प्रात्यक्षिक स्पर्धा निकाल ९/२/२४ लागला. कु. आदित्य अमोल खोत (६अ) हा विद्यार्थी उत्तीर्ण झाला असून, मुलाखत पातळीसाठी त्याची निवड झाली आहे. मार्गदर्शक शिक्षक सौ धोत्रे, सौ सोनवणे, श्री देवघरे

● रोटरी ठाणे क्लब या संस्थेतर्फे दरवर्षी विविध स्पर्धा घेण्यात येतात.

**लेटर रायटिंग स्पर्धा –** विना कांबळे. तृतीय क्रमांक (सातवी क)

**वाद विवाद स्पर्धा –** आर्या जगताप. पाचवा क्रमांक (नववी अ)

**कैवल्य वामन –** पाचवा क्रमांक (नववी अ)


**अथर्वशीर्ष पठण स्पर्धा –** कुमार आदित्य अमोल खोत. सहावी अ प्रथम क्रमांक

● ठाणे महानगरपालिका यांच्यातर्फे वार्षिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते व विविध स्पर्धा घेण्यात आल्या. चित्रकला स्पर्धेत कुमारी अद्वैता राऊत – ५वी अ उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. निबंध स्पर्धेत किमया दौंड – ८वी ब हिला पाचवा क्रमांक मिळाला.



- ब्राह्मण सेवा संघातर्फे कथाकथन स्पर्धा - कुमार अनय पोतनीस - दुसरा क्रमांक प्राप्त

- गुरुवार दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ व शाळेचा वार्षिक अंक 'पारिजातक' याचे प्रकाशन झाले. डॉ. विनय कुमार राठोड पोलिस उपायुक्त ठाणे वाहतूक शाखा यांनी १० वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पारिजातक प्रकाशन पाहुणे माननीय कविता सुरेश परब यांच्या हस्ते करण्यात आले.



- दि. १९/०२/२०२४ गारद फाऊंडेशन, ठाणे. महाराष्ट्र राज्य आयोजित अभिव्यक्त आणि महाराष्ट्राचे शब्दांची रत्ने आंतरशालेय जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा निकाल

**इ. ५ वी ते ७ वी गट**

- स्वरूपा कदम - ६ वी अ - द्वितीय क्रमांक
- अनय पोतनीस - ५ वी अ - तृतीय क्रमांक

**इ. ८ वी ते १० वी गट**

- श्रावणी जाधव ९ वी अ प्रथम क्रमांक
- आर्या जगताप ९ वी अ तृतीय क्रमांक

पारितोषिकाचे स्वरूप सन्मानचिन्ह + रोख रक्कम + प्रमाणपत्र + पुस्तक + छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देण्यात आली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**इंग्लिश ऑलिम्पियाड परीक्षेचा निकाल**

इंग्लिश ऑलिम्पियाड परीक्षेत भरघोस यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे-

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | राष्ट्रीय क्रमांक | मिळवलेले यश |
|---|---|---|---|
| कु.मेहेक शितुत | २री | ५३३ | इ.२रीत प्रथम क्रमांक |
| कु.दिविजा कांबळे | २री | ६३३ | इ.२रीत द्वितीय क्रमांक |
| कु.अर्णव जाधव | २री | ८०१ | इ.२रीत तृतीय क्रमांक |
| कु.श्रेया जोशी | २री | ८५५ | इ.२रीत चौथा क्रमांक |
| कु.पार्थ देशमुख | ३री | २७० | इ.३रीत प्रथम क्रमांक |
| कु.जेनिता लोणे | ३री | ४३५ | इ.३रीत द्वितीय क्रमांक |
| कु.स्पृहा सहस्रबुद्धे | ३री | ७५८ | इ.३रीत तृतीय क्रमांक |
| कु.स्वानंद बेलोसे | ४थी | १४ | राष्ट्रीय स्तरावर यश संपादन |
| कु.ओजस मोडक | ४थी | २५ | राष्ट्रीय स्तरावर यश संपादन |
| कु.अद्वैत वझे | ४थी | ५२ | राष्ट्रीय स्तरावर यश संपादन |
| कु.काव्या मिस्त्री | ४थी | ११० | इ.४थीत चौथा क्रमांक |

**Spell Bee परीक्षेचा निकाल**

**स्तर तिसरा - राष्ट्रीय स्तर**

Spell Bee च्या राष्ट्रीय स्तरावर झालेल्या परीक्षेत आमच्या चिमुकल्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे. १५ विद्यार्थ्यांनी संपादन श्रेणी प्राप्त केली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

Spell Bee परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे-

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. शुभा उतेकर | १ली | १०० |
| २ | कु. आर्वी नवरे | १ली | ९८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | कु. अनुश्री अक्षय बापये | १ली | ९५ |
| ४ | कु. अनन्या पाटकर | १ली | ९४ |
| ५ | कु. स्वरांग वीरकर | १ली | ९२ |
| ६ | कु. आयुर जयवंत औटी | २री | ९८ |
| ७ | कु. निरजा स्वप्निल निर्गुण | २री | ९१ |
| ८ | कु. मेहेक शितूत | २री | ९१ |
| ९ | कु. सना सुशांत कर्णिक | ३री | ९२.५५ |
| १० | कु. स्पृहा रोहित जोशी | ३री | ९० |
| ११ | कु. स्वानंद बेलोसे | ४थी | ९६.७५ |
| १२ | कु. सान्वी कार्तिक मूडबिद्री | ४थी | ९४ |
| १३ | कु. अद्वैत वझे | ४थी | ९२.४ |
| १४ | कु. युक्ता धीरज झगडे | ४थी | ९२.३५ |
| १५ | कु. अथर्व समीर रानडे | ४थी | ९०.७५ |

**२७ फेब्रुवारी – मराठी गौरव दिन साजरा**

लाभले आम्हास भाग्य
बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य
ऐकतो मराठी

आपल्या सर्वांची आपुलकीची, मनातील भाव – भावना व्यक्त करण्यासाठी सहज, सुलभ जवळची वाटणारी भाषा म्हणजे आपली मायबोली 'मराठी'.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस तसेच मराठी भाषेचा गौरव म्हणून २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

२७ फेब्रुवारीला 'मराठी भाषा गौरव दिन' शाळेत आनंदाने साजरा करण्यात आला. शाळेत सगळा परिपाठ मराठीत घेण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मराठी गौरव दिन व कुसुमाग्रज यांची माहिती सांगितली. इ.१ली व २री च्या विद्यार्थ्यांनी बालगीते सादर केली. इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश देणारे एक छान भारूड सादर केले.

**२८ फेब्रुवारी – राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा**

अंधश्रद्धेचे निर्मूलन करून
ज्ञानाचा वसा घेऊ
जिज्ञासा वृत्ती धारण करून
विज्ञान दिन साजरा करू

२८ फेब्रुवारी रोजी शाळेत फारच नियोजनबद्ध व सुंदर असा विज्ञान दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विज्ञानाची किमया, तार्किकता, विज्ञानातील आव्हाने याविषयी एक छान गाणे सादर केले.

भारताचे मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्याविषयी विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी माहिती सांगितली, तसेच वैदिक काळातील ऋषी चरक ऋषी, अगस्त्य ऋषी यांचे 'विज्ञानातील योगदान' याविषयी माहिती देण्यात आली. विज्ञानातील विविध शोध व त्यांचे संशोधक यांची माहिती सांगितली. उदा. गुरुत्वाकर्षण, दूरध्वनी, दूरदर्शन, विमान इ. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा घेतली. विद्यार्थ्यांनी त्यांची उत्तरे देण्याचा आनंद लुटला.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**बृहन्मुंबई निम्नस्तर मराठी शिक्षक संघटना (२०२३–२४)**

| वर्ग | पदवी स्थान |
|---|---|
| V | १) कुमारी क्रिशा कुंदन पवार<br>२) कुमार नील राजेश जोशी<br>३) कुमारी हेत्वी राकेश गुणीजन<br>कुमार शारव अमय आपटे |
| VI | १) कुमारी इशिता विशाल कान्हेरे |

| | |
|---|---|
| | २) कुमारी देवयानी अजित यादव<br>३) कुमारी गौरी समीर वालावलकर |
| VII | १) कुमार गौरव सचिन साळवे<br>कुमार सुमेध मनीष वेलणकर<br>२) कुमारी राधिका रमेश रणदिवे<br>कुमारी सई समीर गडवे<br>कुमारी स्नेहा दादासाहेब पाटील<br>कुमार जय मोहित शास्त्री<br>३) कुमार आकाश समीर गोखले<br>कुमारी शार्वी सुनील नेत<br>कुमारी ईशा परिमल नवरे<br>कुमार श्रीराज सचिन लेले |
| VIII | १) कुमारी मनस्वी गुरुनाथ पालव<br>२) कुमारी रिया हेमंत ठाकरे<br>कुमारी सृष्टी नीतिन कोटावले<br>कुमार शौनक चिंतामणी भागवत<br>३) कुमारी शमिका सुमित काळे<br>कुमारी आर्या आशिष मेहंदळे |
| IX | १) कुमार वरद सुनील जोग<br>२) कुमारी शर्वाणी आशुतोष वैद्य<br>कुमारी राज्ञी संतोष लोलगे<br>३) कुमारी जुई संदीप जोशी<br>कुमारी सान्वी सुनील जोग |
| X | १) कुमार पार्थ दिप्ती देवस्थळी<br>२) कुमारी स्वानंदी सुबोध पाटणेकर<br>कुमार तन्मय चैतन्य जोगळेकर<br>कुमार स्वराज सूर्यकांत चिले<br>३) कुमारी अवनी हृषीकेश देवघर<br>कुमारी अनुष्का वैभव काळे<br>कुमार हर्ष राजेश आंगणे<br>कुमार सोहम किशोर झुंजारराव<br>कुमार अनुज देवेंद्र मोभारकार |

## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

जोशी बेडेकर ज्युनिअर महाविद्यालयातील सहाय्यक शिक्षिका आणि असोसिएटेड एन.सी.सी. ऑफिसर सौ. माधवी महेंद्र जोशी यांना सोळा वर्षांच्या प्रदीर्घ सेवेबद्दल आणि आवश्यक असलेले रिफ्रेशर कोर्स पूर्ण केल्याबद्दल 'मेजर' या पदासाठी बढती मिळाली आहे.



विद्या प्रसारक मडंळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि डॉ. महेश बेडेकर यांनी मेजर माधवी जोशी यांना पदोन्नती बहाल केली. यावेळी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, ज्युनिअर कॉलेज सुपरवायझर सौ. अंजली पुरंदरे, विद्या प्रसारक मडंळाचे पदाधिकारी - रजिस्ट्रार श्री. रसाळ, चिटणीस श्री. अभय मराठे उपस्थित होते.

B.com (Accounting Finance) विभागातर्फे Value Added Course : Industry Research (Building Project Report) आणि Bridge Course : Basics in Mathematics करण्यात आलेत. १. उद्योग संशोधनावरील मूल्यवर्धित अभ्यासक्रम ४ डिसेंबर २०२३ रोजी सुरू झाला आणि १० जानेवारी २०२४ रोजी संपला. अभ्यासक्रम विविध संशोधन पद्धती, डेटा स्रोत, विश्लेषणात्मक साधने, उद्योग संरचना समजून घेणे, संशोधन प्रश्नांबद्दल सर्वसमावेशक समज आणि शिकण्यासाठी डिझाइन केले गेले, डेटा व्हिज्युअलायझेशन टूल्स आणि अभ्यास अहवाल तसेच उद्योग संशोधनातील भविष्यातील ट्रेंड एक्सप्लोर करणे. २. गणित विषयावरील ब्रिज कोर्स ३ जानेवारी, २०२४ रोजी सुरू झाला आणि १० जानेवारी, २०२४ रोजी संपला. वास्तविक

जगातील समस्या सोडवण्यासाठी गणिताच्या ज्ञानाचा सराव आणि उपयोग करणे, मागील शिक्षणातील ज्ञानातील कोणतीही कमतरता भरून काढणे हा या अभ्यासक्रमामागील मुख्य उद्देश आहे. गणिताबद्दल सकारात्मक दृष्टीकोन वाढवणे आणि गंभीर विचारांना प्रोत्साहन देणे समाविष्ट होते..

**७ जानेवारी २०२४** रोजी प्रतिभा आणि सांस्कृतिक समिती तर्फे गंधर्व'२ ४ माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण १५४ विद्यार्थी सहभागी झाले होते. उपक्रमाचा उद्देश –माजी विद्यार्थी आणि कॉलेज यांच्यातील संपर्क विकसित आणि मजबूत करण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन केले होते. उपक्रमाचा सारांश – दरवर्षीप्रमाणेच – ल्युमिनी आले आणि कार्यक्रमाचा आनंद घेतला. तसेच नेहमीप्रमाणे अनौपचारिक अभिप्राय बैठक स्वप्नील सर यांनी आयोजित केली होती, त्यांनी सर्जचा उद्देश आणि त्याचे सदस्यत्व, गंधर्व २४ दिवसांच्या कार्यक्रमांशी संबंधित काही योजना आणि कार्यशाळेतील activity यासारख्या अनेक बाबींचा समावेश केला. या वर्षी सर्जने वर्षभर विविध सांस्कृतिक उपक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी कॉलेजच्या टॅलेंट आणि कल्चरल कमिटीला ब्लूटूथ स्पीकर बक्षीस केले. ल्युमिनीने ऑनडे ऑर्गनायझेशन वगैरेसाठी काही वैध सूचनाही दिल्या. दिवसाची सांगता खूप आनंदात झाली.

**१ फेब्रुवारी २०२४** – बी.कॉम. अकाउंट आणि फायनान्स विभागातर्फे युनियन बजेट २०२४-२५ सादरीकरणाचे विद्यार्थ्यांना थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले.

**२ फेब्रुवारी २०२४ –** (१) Social media and content creation या विषयावर मास मीडिया विभागातर्फे श्री. समीर गुडेकर (Founder and Creative Head of OK Then Advertising Company)आणि श्रीमती सोनल सुर्वे (Co. Founder and Business Head of OK Then Advertising Company)यांचे अतिथी भाषणाचे आयोजन करण्यात आले होते.

(२) Change is constant '- जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या 'ऋत' वृत्तपत्राच्या मुलाखती दरम्यान डॉ. विजय बेडेकर यांचे प्रतिपादन

विद्या प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष व ठाण्यातील ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ व वैद्यक तज्ज्ञ डॉ. विजय बेडेकर यांची मुलाखत शुक्रवारी दि. ०२ फेब्रुवारी २०२४ रोजी 'प्राच्य विद्या अभ्यास संस्था' येथे पार पडली. ही मुलाखत जोशी बेडेकर महाविद्यालयांकडून प्रकाशित होणाऱ्या 'ऋTA' या वार्षिक वृत्तपत्राच्या टीम ची मुख्य संपादक इंद्रायणी लेले, मराठी संपादक भाग्यश्री नागांवकर, इंग्लिश संपादक अनामिका शर्मा, मराठी मुख्य वार्ताहर दिक्षा गांधी आणि इंग्लिश मुख्य वार्ताहर दिवेश चव्हाण यांनी घेतली. मुलाखती दरम्यान जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागाचे समन्वयक तसेच उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि डॉ. विमुक्ता राजे उपस्थित होत्या.

मुलाखती दरम्यान डॉ विजय बेडेकर यांनी अत्यंत उत्तम असे मार्गदर्शन 'ऋTA' च्या टीमला केले. त्यावेळी बोलताना सर म्हणाले ''राष्ट्राच्या विकासात योगदान म्हणून आपले सर्वस्व अर्पण केले पाहिजे.'' पुढे सर असेही म्हणाले की ''change is constant.'' बदल हा अनिवार्य आहे. बदलासाठी कायम तयार राहायला हवे. मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, कृत्रिम बुद्धिमत्ता, वैद्यक क्षेत्रातील झालेले बदल अशा विविध प्रश्नांना सरांनी उत्तरे दिली.

मुलाखती नंतर संपूर्ण ऋTA टीमने प्राच्य विद्या अभ्यास संस्थेला भेट दिली. तेथे उपलब्ध असलेली पुरातन हस्तलिखिते, दुर्मीळ ग्रंथ, उत्खननात सापडलेले

प्राचीन अवशेष पाहायला मिळाले. प्राचीन काळी वापरले जाणारे पंखे, लाकडी बूट, कप अशा शेकडो वस्तू या अभ्यास संस्थेत विद्यार्थ्यांना पाहायला मिळाल्या. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सदर अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

३. Data Analytics या विषयावर मास मीडिया विभागातर्फे श्री. संजय साने (Sane Academy of Data Science, पुणे) अतिथी भाषणाचे आयोजन करण्यात आले होते.

४. इतिहास विभाग : उपक्रमाचे शीर्षक– शनिवारवाडा आणि डेक्कन कॉलेज, पुणे येथे अभ्यास सहलीचे आयोजन केले होते. इतिहास विभागातील ३५ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. पेशवे बाजीराव प्रथम यांनी बांधलेल्या शनिवारवाड्याला विद्यार्थ्यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांनी डेक्कन कॉलेज आणि कॉलेजच्या आवारातील सात संग्रहालयांनाही भेट दिली.

५ फेब्रुवारी : मल्टीमीडिया आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी स्पर्धा, Rta 2023-24.

**स्पर्धेचे नाव :** (i) लाइट्स इन (फोटोग्राफी स्पर्धा) (ii) चित्र रंग (चित्रकला स्पर्धा) (iii) कहो जो चाहो (ओपन माइक स्पर्धा) (iv) कवितांची नगरी (कविता स्पर्धा) (v) उलट (वादविवाद स्पर्धा) एकूण सहभागींची संख्या : ५३

(i) कविता स्पर्धा – १८ (ii) छायाचित्रण स्पर्धा – ९ (iii) वादविवाद स्पर्धा – ७ (iv) खुली माइक स्पर्धा – ८ (v) चित्रकला स्पर्धा – ११.

निर्णायक : डॉ. संगीता मोहंती, कु. इशिता प्रधान, कु. मानसी जंगम, कु. हर्षदा पठारे आदी होते.

श्री. शगुन यादव यांच्या नेतृत्वाखाली भव्य उद्घाटन सोहळा सकाळी १० वाजता सुरू झाला. मुख्य संपादक, इंद्रायणी लेले यांनी सर्जनशीलतेने भरलेल्या दिवसासाठी एक प्रेरणादायी भाषण केले. सकाळी १०:३० वाजता कविता, छायाचित्रण, वादविवाद, ओपन माईक, रेखाचित्र या स्पर्धांना सुरुवात झाली. दुपारी अडीच वाजता मनसोक्त मतदान करून दिवस संपला.

**६ फेब्रुवारी –** ग्रीन क्लब समिती तर्फे माझा 'कचरा माझी जबाबदारी' या कार्यक्रमांतर्गत स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

**७ फेब्रुवारी – इंग्रजी विभाग :–** 'विजय तेंडुलकरांचे नाट्य' उत्कृष्टता, या विषयावर डॉ अनिल ढवळे हिंदीचे प्राध्यापक आणि एचओडी अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विजय तेंडुलकर यांच्या भाषिक उत्कृष्टतेवर चर्चा करणे आणि लेखन आणि प्रकाशनाच्या दृष्टीने साहित्यातील करिअरच्या विविध पैलूंबद्दल विद्यार्थ्यांना अंतर्दृष्टी देणे हा या व्याख्यानाचा उद्देश होता. विद्यार्थ्यांना कौशल्य विकासावर भर देण्यासाठी प्रेरित केले

**९ फेब्रुवारी** – (१) बी. कॉम विभागातर्फे (लेखा आणि वित्त) मूट कोर्ट केसेस – रोलप्ले यात विद्यार्थ्यांची सहभागी संख्या – एकूण : १८७, १०५–महिला, ८२ – पुरुष इतकी होती.

उपक्रमाचा सारांश :– मूट कोर्ट भूमिकांमध्ये सहभागी होण्याच्या उद्देशामध्ये कायदेशीर संशोधन आणि लेखन कौशल्याचा सन्मान करणे, तोंडी वकिली क्षमता विकसित करणे, न्यायालयीन खोलीची प्रक्रिया समजून घेणे, गंभीर विचार आणि कायदेशीर तत्त्वांसह विश्लेषणात्मक कौशल्ये सुधारणे यांचा समावेश होतो.

(२) उड्डाण महोत्सव ९ फेब्रुवारी,२०२४ रोजी पार पडला. हा डीएलएलई समितीने आयोजित केला. यात

एकूण ७७ विद्यार्थ्यांनी स्वयंसेवकांची भूमिका जबाबदारीने पार पाडली. यात एकूण १७ शिक्षक व २२ महाविद्यालयातील ३४३ विद्यार्थी सहभागी झाले. या कार्यक्रमाचा उद्‌घाटन सोहळा मा. श्री. अनिरुद्ध जोशी, मा. प्रा. डॉ. सुचित्रा नाईक, प्रा. कुणाल जाधव यांच्या उपस्थितीत पार पडला. उड्डाण मध्ये पथनाट्य,पोस्टर मेकिंग, वक्तृत्व व सर्जनशील लेखन अशा विविध स्पर्धा पार पडल्या. यापैकी सर्जनशील लेखांमध्ये जोशी बेडेकर महाविद्यालयाला कांस्य पदक व तसेच पथनाट्य,पोस्टर मेकिंग व वक्तृत्व स्पर्धेमध्ये जोशी बेडेकर महाविद्यालयाला सांत्वन बक्षीस मिळाले. या कार्यक्रमाचा समारोप सोहळा डॉ. महेश पाटील व डॉ. संगीता मोहंती यांच्या उपस्थित पार पडला. या उड्डाण महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व सामाजिक जागरूकता निर्माण झाली तसेच व्यक्तिमत्त्व विकास देखील झाला.

(३) B.com विभाग (लेखा आणि वित्त) तर्फे औद्योगिक भेट – सह्याद्री फार्म्स (अग्रगण्य फळे आणि भाजीपाला निर्यात आणि प्रक्रिया कंपनी, नाशिक) MAF भाग I आणि MAF भाग II वर्गांसाठी भेटीचे आयोजन करण्यात आले होते यात एकूण : ६२, पुरुष – २२ महिला – ४० सहभागी झाले होते.

उपक्रमाचा उद्देश – औद्योगिक भेट म्हणजे सैद्धांतिक ज्ञानाचा वास्तविक जगाचा वापर विद्यार्थ्यांसमोर आणणे, व्यावहारिक कौशल्ये वाढवणे, नेटवर्किंग संधी प्रदान करणे तसेच प्रेरणादायी करिअर एक्सप्लोरेशन, शैक्षणिक संकल्पना आणि उद्योग प्रक्रियेची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामधील अंतर दूर करते. हे विद्यार्थ्यांना समकालीन जगातील नवीनतम तंत्रज्ञान समजून घेण्यास मदत करते, त्याच वेळी यामुळे विद्यार्थ्यांचा वैयक्तिक आणि व्यावसायिक विकास वाढविणे हा या भेटीचा उद्देश होता.

४. संकृत विभागातर्फे पुणे शहरातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि सिंहगड येथे पुरातत्त्व विभाग आणि संस्कृत विभागाचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. उपक्रमाचा उद्देश – डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि सिंहगड येथे पुणे शहराचा अभ्यास सहलीमुळे विद्यार्थ्यांना दस्तऐवज, स्मारके हस्तलिखित आणि जुन्या मौल्यवान वस्तू जतन करण्यात संग्रहालयाची भूमिका समजून घेण्यास सक्षम करते या भेटीमुळे नेटवर्किंगच्या संधी, उद्योग व्यावसायिकांशी अभ्यागतांना जोडणे आणि संभाव्य करिअर मार्गांचे प्रदर्शन करणे सुलभ होऊ शके. याव्यतिरिक्त संशोधनास प्रेरणा देते, सर्जनशील प्रकल्पांसाठी त्यांच्या अभ्यासाच्या तंत्रांची व्यावहारिक समज प्रदान करताना माहितीचा समृद्ध स्रोत प्रदान करणे. एकूणच, ही एक सर्वसमावेशक अनुभवात्मक शिक्षणाची संधी देणारी आणि डिक्शनरीच्या कामाबद्दलचा आवाका समजून घेणारी सहल ठरली.

DLLE समिती ने उडान – विस्तार महोत्सव– मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने (आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा) आयोजित केला होता. यात एकूण ३४३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

सारांश – उडान – विस्ताराची उड्डाणे ही एक आंतर महाविद्यालयीन स्पर्धा आहे. उद्‌घाटन सत्र श्री अनिरुद्ध जोशी (VPM व्यवस्थापन समितीचे सन्माननीय सदस्य), प्राचार्य डॉ. (सौ.) सुचित्रा नाईक, प्रा. कुणाल जाधव, DLLE, UOM आदी मान्यवर उपस्थित होते. DLLE स्वयंसेवकांमध्ये आत्मविश्वास, सामाजिक जागरूकता आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन केले होते. संघ बांधणी, संघटनात्मक कौशल्ये वाढवणे आणि विद्यार्थ्यांना सहयोगी कार्यासाठी प्रेरित करणे हे या महोत्सवाचे उद्देश आहेत. महाविद्यालयाला पुढील स्पर्धांमध्ये यश प्राप्त झाले.

१. सर्जनशील लेखनासाठी कांस्य पदक
२. निवडणूक साक्षरतेवरील पथनाट्यासाठी उत्तेजन पुरस्कार–

३. पोस्टर बनवण्यासाठी उत्तेजन पुरस्कार

४. वक्तृत्व स्पर्धेस उत्तेजन पुरस्कार.

व्हीपीएमचे सर्व अधिकारी, विद्यापीठातील अधिकारी, प्राचार्या मॅडम, सर्व उपप्राचार्य, सर्व विभागप्रमुख, समन्वयक, मान्यवर, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांचे UDAAN महोत्सव २४ सुरळीत पार पाडल्याबद्दल अनेक आभार.

**९ आणि १० फेब्रुवारी** - Department of Banking and Insurance and Department of Financial Markets with Research and Development cell in association with BFSI Sector Skill Council and Financial Academy One Day Inter-Collegiate Seminar- Money Symphony VI - Wealth Wisdom- Empowering Your Financial Future एक दिवसीय आंतर-महाविद्यालयीन सेमिनार- मनी सिम्फनी VI - संपत्ती बुद्धी - 'तुमचे आर्थिक भविष्य सक्षम करणे' या विषयावर आयोजित केला होता. प्रमुख पाहुणे-डॉ तीर्थंकर पटनायक, मुख्य अर्थतज्ज्ञ, नॅशनल स्टॉक एक्सचेंज पॅनेल चर्चा - श्री मनीष राठी, अध्यक्ष, ग्लोब सिक्युर इन्शुरन्स ब्रोकर्स, श्री जिनय सावला, भागीदार, देशी गुंतवणूकदार, श्री रिंकेश तुनवाल, क्रेडिट सल्लागार मार्स्क. Valedictory Address -C.A. केदार प्रभुदेसाई, वित्त आणि जोखीम व्यवस्थापन सल्लागार. उपक्रमाचा उद्देश - सध्याच्या गुंतवणुकीचे वातावरण आणि यशस्वी करिअरच्या दृष्टीने आर्थिक क्षेत्रातील विविध संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे. उपक्रमाचा सारांश - प्रमुख वक्ते डॉ. तीर्थंकर पटनायक, उप-मुख्याध्यापक प्रा सुभाष शिंदे आणि डॉ. महेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्राची सुरुवात झाली. पटनायक यांनी विषयावर उद्घाटनपर भाषणात 'भारतातील सध्याचे गुंतवणूक वातावरण - संधी आणि आव्हाने' मध्ये तथ्ये आणि आकडेवारीचे समर्थन करणाऱ्या तपशीलवार तक्त्यांद्वारे आर्थिक वाढीस चालना देणारे प्रमुख मॅक्रो आर्थिक निर्देशक समाविष्ट आहेत. त्यांनी बाजारातील कामगिरीबद्दल देखील सांगितले आणि अर्थव्यवस्थेच्या भविष्यातील आउटलुकबद्दल सकारात्मक भाष्य केले. श्री मनीष राठी, श्रीमान जिनय सावला आणि श्री रिंकेश तुनवाल यांच्या पॅनेलचे सूत्रसंचालन TYBFM मधील शुभम पुरोहित यांनी केले आणि त्यात वित्त आणि करिअरच्या विविध संधींचा समावेश केला.सेमिनारचे कार्यक्रम दोन टप्प्यांत पार पडले. शुक्रवार, ९ फेब्रुवारी २०२४ आणि शनिवार, १० फेब्रुवारी २०२४ रोजी स्ट्युट ट्रेडर, रिस्क वाईज आणि आयडिया उपक्रमाचे प्री इव्हेंट्स आयोजित करण्यात आले होते. रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेल, कॉर्पोरेट अलायन्स आणि जॉब होरायझन्स यांच्या संयुक्त विद्यमाने रिसर्च पेपर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. न्यायाधीश पॅनेलमध्ये अंतर्गत आणि बाह्य दोन्ही तज्ज्ञांचा समावेश होता.

तपशील- Astute Trader

प्रथम - नियती वैती, पिल्लई कॉलेज

उपविजेते- स्वप्नील आरोटे, जोशी बेडेकर
दर्शन कांबळे, जोशी बेडेकर

Risk Wise प्रथम - विशाल, हर्ष, मिहीर, प्रणय सबत, जोशी बेडेकर

द्वितीय - मोनिशा, जेफिन जोस, प्रशांत, पिल्लई कॉलेज

आयडिया व्हेंचर- प्रथम - प्रथम पारितोषिक - महेक रोहरा आणि लक्ष्मी शिंदे, जोशी बेडेकर

उपविजेते - गोपाळ राऊत, कालिंदी ठाकरे आणि दीपेश कुमार राव, पोद्दार कॉलेज

जॉब होरायझन- प्रथम - चेतन समर्थ, पोद्दार कॉलेज
दुसरा - दिपेशकुमार राव, पोद्दार कॉलेज

कॉर्पोरेट अलायन्स - प्रथम - जेफिन, मोनिषा, प्रशांत, आणि हर्षल, पिल्लई कॉलेज द्वितीय- श्रेया पेंडसे, अदिती पुजारी, ऋतुराज आरिया, जोशी बेडेकर

सर्व प्रथम पारितोषिक विजेत्यांना सुवर्णपदक, ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले. उपविजेत्या खेळाडूंना रौप्य पदक व प्रमाणपत्र देण्यात आले.

शोध निबंध - प्रथम - अदिती बन्सल, आणि दर्शन गडगोली, जोशी बेडेकर

दुसरी - करिश्मा राजपाल, पिल्लई कॉलेज प्रथम पारितोषिक विजेत्यांना १००० रुपये रोख, सुवर्णपदक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र, उपविजेत्याला ५००/- रोख पारितोषिक, रौप्य पदक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देण्यात आले.

**१० फेब्रुवारी –** एन.एस. एस. युनिट तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन कुपर हॉस्पिटल च्या मदतीने करण्यात आले होते. यात एकूण २४ रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला. रक्तदान मोहिमेचे उद्घाटन आदरणीय प्रा. नारायण बारसे, ग्रंथपाल आणि ग्रंथालय व ग्रंथालय विज्ञान अभ्यासक्रमांचे समन्वयक तसेच उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे आणि NSS टीम यांच्या हस्ते करण्यात आले.

**१२ फेब्रुवारी –** B.voc विभाग (विक्री आणि विपणन व्यवस्थापन) तर्फे १२ फेब्रुवारी २०२४ रोजी नीलम अप्लायन्सेस लि. (घरगुती ब्रँड आणि किचन सेटचे मास्टर) आणि जाधव यांच्या लक्ष्मी फूड्स प्रा. Ltd. (सर्व प्रकारच्या पिढ्यांसाठी सुपर-हेल्दी स्नॅक्स बनवण्यात अग्रेसर) इ. तेल प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष वर्गांसाठी. औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते. उपक्रमाचा उद्देश -

औद्योगिक भेटी विद्यार्थ्यांना वास्तविक जीवनातील औद्योगिक सेटिंगजमध्ये सैद्धांतिक संकल्पना कशा लागू केल्या जातात हे पाहण्याची मौल्यवान संधी प्राप्त झाली औद्योगिक प्रक्रियांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन, विद्यार्थी त्यांच्या भविष्यातील करिअरसाठी आवश्यक असलेली व्यावहारिक कौशल्ये विकसित करू शकतील. या भेटींमध्ये सामान्यत: लॉजिस्टिक आणि उत्पादन सुविधांचा दौरा समाविष्ट असतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना या प्रक्रियेतील गुंतागुंत आणि विविध उद्योगांमध्ये त्यांची भूमिका समजून घेण्यात मदत होते. विविध औद्योगिक वातावरणाचा अनुभव घेतल्याने विद्यार्थ्यांना करिअरचे विविध मार्ग शोधण्यासाठी, त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी त्यांची क्षितिजे आणि शक्यता विस्तृत करण्यासाठी प्रेरणा दायी ठरेल. यात एकूण ७६ विद्यार्थी सहभागी होते.

**२० फेब्रुवारी –** १) कौशल्य विकास आणि उद्योजकता सेल विभागातर्फे निरीक्षणातील वेदना बिंदू कॅप्चर करणे विषयावर यांचे डॉ. नीतिन जोशी संचालक, BRIMS आणि डॉ. विभूती सावे, BRIMS अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पुरुष :७६ महिला : ९० उपक्रमाचा उद्देश - VPM च्या इनक्युबिशन केंद्राविषयी जागरुकता निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांच्या संधींसाठी विचारांचे मंथन करणे.

उपक्रमाचा सारांश - VPM'S इनक्युबेशन सेंटर, VPM'S के जी जोशी कॉलेज ऑफ आर्ट्स आणि N.G. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स ऑटोनॉमस यांच्या छत्राखाली कौशल्य विकास आणि उद्योजकता सेलने कॅम्पसमधील भगिनी संस्थांशी हातमिळवणी करून 'कॅप्चरिंग पेन पॉइंट्स टू ऑपर्च्युनिटीज' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित केले. प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करून त्यांना मिळालेल्या संधींचा लाभ घेण्यास प्रोत्साहित केले. डॉ. नीतिन जोशी संचालक डॉ. व्ही. एन. ब्रिम्स आणि डॉ विभूती सहाय्यक प्रा. डॉ. व्ही. एन ब्रिम्स यांनी विद्यार्थ्यांना 'वेदना बिंदूंचे निरीक्षण करणे' आणि अशा निरीक्षणातून संधींकडे जाणाऱ्या कल्पनांचे मंथन करण्याचे महत्त्व समजून घेण्यासाठी एक हँडऑन सत्र आयोजित केले जोशी बेडेकर कॉलेज, डॉ. व्ही. एन. ब्रिम्स, व्हीपीएम पॉलिटेक्निक आणि बांदोडकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि सत्राचा लाभ घेतला.

२. डॉ. वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय आंतर-महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा २०२४ डॉ. वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी ऑनलाईन स्वरूपात आयोजित करण्यात आली होती स्पर्धेचे हे दहावे वर्ष असून ही स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली होती. राज्यभरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी झाले होते. प्रा. तेजस्विनी नाडगौडा आणि अतुल माने यांनी निर्णायकाची भूमिका पार पाडली. विजयी संघ -

प्रथम क्रमांक - एस.पी. कॉलेज, पुणे

द्वितीय क्रमांक - गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

तिसरे क्रमांक - विवेकानंद महाविद्यालय, चेंबूर

**२१ फेब्रुवारी २०२४ –** छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५० वा राज्याभिषेक सोहळा एन. एस. एस. समिती तर्फे आयोजन करण्यात आला होता.

**२१ फेब्रुवारी २०२४ –** जोशी बेडेकर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन व प्लेसमेंट सेल अंतर्गत सुथरलंड ग्लोबल सर्व्हिसेस यांना आमंत्रित करून २१ फेब्रुवारीला प्लेसमेंट ड्राईव्ह करण्यात आला. यात प्रमुख अतिथी नागार्जुन जेला उपस्थित होते. यामध्ये एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले. त्यापैकी ११ विद्यार्थी वार्षिक पगार २,००,००० वर निवडले गेले.

**२४ फेब्रुवारी २०२४ –** रोजी प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे आणि जोशी बेडेकर महाविद्यालय या संस्थांनी एकत्रितपणे 'पुरातत्त्वीय सर्वेक्षण व उत्खनन पद्धती' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन जोशी-बेडेकर महाविद्यालय येथे केले होते. पुरातत्त्वशास्त्र यात रस असणाऱ्या सगळ्यांसाठी ही कार्यशाळा खुली होती. ह्यासाठी डेक्कन कॉलेज येथे संशोधन सहाय्यक असलेले डॉ. शंतनू वैद्य व डेक्कन कॉलेज मधील संशोधन अभ्यासक डॉ. जयेंद्र जोगळेकर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. सुरुवातीला सर्वेक्षणाच्या विविध पद्धती, शास्त्रशुद्ध उत्खनन पद्धती आणि मिळालेल्या पुराव्यांच्या नोंदी या विषयी ppt आणि व्हीडिओच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना पुरातत्त्वीय उत्खननाचा अनुभव घेता यावा यासाठी ह्या कार्यशाळेचे आयोजन केले गेले असून विद्यार्थ्यांना, उत्खनन करणे, उत्खननात आढळणाऱ्या वस्तूंचे माप घेऊन त्यांच्या नोंदी करणे या सगळ्यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले आणि त्यासाठी महाविद्यालयाच्या मैदानात एक पुरातत्त्वीय उत्खननासारखा खड्डा तयार करण्यात आला होता. भोजना नंतरच्या सत्रात विद्यार्थ्यांनी या तयार केलेल्या साईटवर प्रत्यक्ष उत्खनन केले. सरावासाठी काही वस्तू मुद्दाम खड्ड्यात लपवण्यात आल्या होत्या. त्या शास्त्रीय पद्धतीने विद्यार्थ्यांनी शोधून काढल्या आणि त्यांच्या योग्य पद्धतीने नोंदी करण्यात आल्या. एकूण २६ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत प्रत्यक्ष पुरातत्त्वीय उत्खननाचा अनुभव घेतला. प्राच्यविद्या अभ्यास संस्था गेली अनेक वर्ष इतिहास, संस्कृती व या संबंधी विषयांवर व्याख्याने, प्रदर्शने, परिषदा, हेरिटेज वॉक, आयोजित करत असते, डिसेंबर मध्ये पार पडलेल्या व्याख्यानात या एकदिवसीय कार्यशाळेची घोषणा केली गेली होती, ते पार पडले. या एकदिवसीय कार्यशाळेला विद्यार्थी व जिज्ञासूंकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. प्राच्यविद्या अभ्यास संस्था विविध नामांकित अभ्यास संस्थांमधून तज्ञांना निमंत्रित करून पुरातत्त्वशास्त्रात रुची असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देते आहे याची विद्यार्थ्यांनीही दखल घेऊन कौतुक केले. जोशी-बेडेकर महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक असलेले अंकुर काणे हे या कार्यशाळेचे समन्वयक होते. प्राच्यविद्या अभ्यास संस्थेने हाती घेतलेल्या ह्या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पुरतत्त्वशास्त्र-विषयी कुतूहल आणि रुची निर्माण होत

आहे. असे अनेक उपक्रम या पुढेही राबवण्याचा संस्थेचा मानस आहे.

**२६ फेब्रुवारी २०२४** – (१) महाविद्यालयातील करिअर मार्गदर्शन व प्लेसमेंट सेलनी उंबरमाळीत आयएसआर २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी आयोजित केली. यात एकूण एक शिक्षिका व २० विद्यार्थी सहभागी झाले. यात ग्रामपंचायतीतील शाळेतल्या आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय व महाविद्यालयीन शिक्षण रोजगार प्राप्तीसाठी कसे महत्त्वाचे आहे याची जाणीव करून दिली गेली.

(२) B.com विभाग आणि एम.कॉम. (लेखा आणि वित्त) सामितेतर्फे सशक्तीकरण उमरमाळी : महिला साक्षरतेकडे एक प्रवास या कार्यक्रमांतर्गत गावातून एकूण १३५ प्रतिसाद संकलित करण्यात आल्याचे सर्वसमावेशक सर्वेक्षण करण्यात आले. महिला साक्षरतेची सद्यस्थिती मोजण्यासाठी एक महिला साक्षरता उपाय. हे महिला साक्षरतेला चालना देण्यासाठी शिक्षणाची रचना करण्यासाठी माहिती प्रदान करणे तसेच विविध अडचणी देखील ओळखता येणे या प्रकल्पाचा उद्देश होता.

३. Department of B.com (Banking and Insurance) and Department of B.com (Financial Markets) विभागातर्फे सामाजिक उत्तरदायित्व विभागाचा एक भाग, BBI आणि BFM विभाग NSS सह सामील झाले आणि उंबरमाळी या दत्तक गावात आर्थिक साक्षरतेवर नाटक आयोजित केले. नाटकाचा विषय होता 'बचत गट'. विद्यार्थ्यांनी या नाटकाच्या माध्यमातून गावातील महिलांच्या गटाला बचत गटाची निर्मिती आणि त्यातून होणारे फायदे याबद्दल जनजागृती केली. त्यांनी बचत गटाच्या निर्मितीसाठी योजना आणि संबंधित कागदपत्रांबद्दल देखील सांगितले. महिलांना सत्र उपयुक्त वाटले.

४. सर्व TYBA आणि MA व्यवसाय अर्थशास्त्र विभागातर्फे अर्थ – विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होते. अतिथी श्री. प्रशांत औटे आणि श्री. प्रियांक जैन हे होते. VPM च्या जोशी बेडेकर कॉलेज (स्वायत्त), ठाणे सोबत नाबार्ड कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (NABACONS) यांनी सर्व TYBA विषय आणि MA बिझनेस इकॉनॉमिक्सच्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता कार्यशाळा आयोजित केली होती. विद्यार्थ्यांना बचतीचे महत्त्व आणि संपत्ती निर्माण करण्यासाठी गुंतवणुकीचे मार्ग माहित करून देण्यात आले. जोखीम-परताव्याच्या विश्लेषणातील आधुनिक ट्रेंडसह वैयक्तिक वित्त व्यवस्थापित करण्यासाठी तंत्र आणि युक्त्या यावर चर्चा करण्यात आली. कार्यशाळे-अंतर्गत विद्यार्थ्यांना खालील सेवा मोफत देण्यात आल्या.

a) मोफत बँक खाते उघडणे b) मोफत पॅन कार्ड निर्मिती c) NABARD द्वारे प्रायोजित एक वर्षासाठी www.arthnirmiti.com द्वारे आर्थिक साक्षरता ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी विनामूल्य प्रवेश d) DMAT खाते मोफत उघडणे व्यापारासाठी रु. १०० जमा केले.

५. मल्टीमीडिया आणि मास कम्युनिकेशन विभाग विभागीय सामाजिक जबाबदारीचा एक भाग म्हणून उंबरमाळी ग्रामपंचायत शाळेतील विद्यार्थ्याशाठी शालेय विद्यार्थ्यांमधील मूलभूत संप्रेषण कौशल्ये सुधारणे आम्ही इयत्ता ६ वी साठी संप्रेषण वर्धित उपक्रम आयोजित केले.

**२७ फेब्रुवारी २०२४ –** १) मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने २७ फेब्रुवारी २०२४ रोजी जोशी-बेडेकर महाविद्यालय ग्रंथालयामध्ये ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथाप्रदर्शनामध्ये २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये ग्रंथालयात दाखल झालेले लक्षणीय मराठी ग्रंथ प्रदर्शित करण्यात आले होते. विशेषत: परदेशी भाषेतील नावाजलेल्या अनुवादित ग्रंथाचा समावेश यामध्ये करण्यात आला होता.

२. Commerce and MCom विभागातर्फे उंबरमाळी

जिल्हा परिषद शाळेतील ३४ विद्यार्थ्यांना (महिला : २३, पुरुष: ११) पैशांची बचत आणि बँकेत ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी एक सत्र आयोजित केले होते. सत्रामध्ये बँक व्याजाची गणना करण्यासाठी स्पर्धात्मक खेळानंतर परस्परसंवादाचा समावेश होता. या खेळात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना विभागातर्फे पेन व चॉकलेटचे वाटपही करण्यात आले. सदर शाळेतील विद्यार्थ्यांना सत्र उपयुक्त आणि आनंददायी वाटले.

३. सामाजिक उत्तरदायित्व विभागाचा एक भाग म्हणून, NSS सह राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आमच्या दत्तक गाव उंबरमाळी येथील जिल्हा परिषद शाळेत घटनात्मक जागृती सत्र आयोजित करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना राज्यघटनेची निर्मिती, राज्यघटनेची वैशिष्ट्ये, मुलभूत हक्क या विषयांवर विद्यार्थ्यांनी पोस्टर तयार केले. डॉ. श्वेता अहिरे यांनी मूलभूत अधिकारांचे महत्त्व पटवून दिले. एकूणच शालेय विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्यांची जाणीव झाली.

४. सामाजिक उत्तरदायित्व विभागाचा एक भाग म्हणून, NSS सह संस्कृत विभागातर्फे उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेतील १२ विद्यार्थ्यांना (महिला: ०६, पुरुष: ०६) संस्कृत स्मरणक्रीडा आणि संस्कृत गीते आणि कथांचे आयोजन करण्यात आले. या सत्रात विद्यार्थ्यांशी संवाद आणि त्यानंतर संस्कृत शब्दांबद्दल मेमरी गेमचा समावेश होता. या खेळात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना विभागातर्फे चॉकलेटचे वाटप करण्यात आले. सदर शाळेतील विद्यार्थ्यांना सत्र आनंददायी वाटले.

५. सामाजिक उत्तरदायित्व विभागाचा एक भाग म्हणून, NSS सह संस्कृत विभागातर्फे उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेतील FYBVOC आणि SYBVOC च्या ४ विद्यार्थ्यांनी ५वी आणि ६वी इयत्तेच्या ३४ विद्यार्थ्यांसह (२२ महिला आणि १२ पुरुष) पेपर फ्लॉवर बनवण्याचा कौशल्य वर्धित क्रियाकलाप आणि काही सोपे व्यवस्थापन खेळ आयोजित केले. सर्व विद्यार्थ्यांनी सत्राचा आनंद लुटला आणि त्यात योगदान दिले.

६. महाराष्ट्र निवडणूक आयोगाकडून दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी निवडणूक प्रक्रिया. अतिथी डॉ. आसावरी संसारे – (AERO १४८ मतदारसंघ) सौ नीलिमा मोहिने – (उपनिवडणूक आयुक्त) सौ स्मिता मोहिते –(निवडणूक जिल्हा समन्वयक अधिकारी) डॉ. प्रियंवदा टोकेकर – उपप्राचार्य कु. छाया कोरे – उप–प्राचार्य कनिष्ट महाविद्यालय सौ. अंजली पुरंदरे –पर्यवेक्षक कनिष्ट महाविद्यालय महाराष्ट्र निवडणूक आयोगाच्या सहकार्याने अतुल्य सर्वसमावेशक कक्षाने दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी निवडणूक प्रक्रिया सत्राचे आयोजन केले होते.

- दृष्टिहीन विद्यार्थ्यांना मतदानाच्या प्रक्रियेची जाणीव आहे याची खात्री करणे.
- विद्यार्थ्याने मतदान केल्याचा पुरावा म्हणून बोटावर शाई लावून विद्यार्थ्यांची पडताळणी करण्यात आली आणि उपस्थित चिन्हांकित केले गेले.
- वास्तविक ईव्हीएम मशीन आमच्या अतुल्य विद्यार्थ्याने टाइप केलेल्या चिन्हासह ब्रेल लिपीत उमेदवारांच्या नावासह होते.
- विद्यार्थी अत्यंत प्रेरित आणि निवडणूक प्रक्रियेबद्दल जागरूक होते.
- शेवटच्या मतदारापर्यंत पोहोचणे हे निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट आहे.

**२८ फेब्रुवारी २०२४ –** १) जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या स्वामी विवेकानंद स्टडी सर्कलनी उंबरमाळीत २८ फेब्रुवारी, २०२४ ला आयएसआर आयोजित केली. यात डॉ. ऊर्मिला शेतवे शिक्षिका व २ स्वयंसेवक सहभागी झाले. यात स्वामी विवेकानंदांच्या कथा सांगण्यात आल्या व ओमकार साधना घेण्यात आली.

सामाजिक उत्तरदायित्व विभागाचा एक भाग म्हणून, NSS सह डी.एल.एल/इ समितीतर्फे तर्फे उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना पेपर फ्लॉवर मेकिंग वरील सत्र जे सर्जनशील कौशल्य निर्माण करणारे आणि मनात सर्जनशीलता वाढवणारे ठरले.

२) सहाय्यक प्रा.स्वप्नील मयेकर यांनी नेतृत्व आणि संघर्ष निवारण या विषयावर शाळेतील मुलांशी संवाद साधला.

विवेकानंद स्टडी सर्कलचे विद्यार्थी – निधी भालेराव आणि स्नेहा कोंडार यांनी स्वामी विवेकानंदांच्या सुरुवातीच्या जीवनावर आधारित नैतिक अभिमुख कथा-कथन.

३) त्यांची एकाग्रता कौशल्ये वाढवण्यासाठी संवाद आणि ओंकार साधना सत्र.

३) माइंडफुलनेस एक्सप्लोर करण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी फ्रीहँड ड्रॉइंग, यामुळे मनात सर्जनशीलता देखील निर्माण होणारे सत्र घेण्यात आले.

**२९ फेब्रुवारी २०२४ –** जोशी बेडेकर महाविद्यालयात ग्रीन क्लब अंतर्गत उंबरमाळीत जल सर्वेक्षण करण्यात आले. यात एकूण ४ विद्यार्थी व ग्रीन क्लब फॅकल्टी समन्वयक सुदाम अहिरराव सहभागी झाले. या सर्वेक्षणात असे लक्षात आले की उंबरमाळीत एकूण २ तलाव, ३ विहिरी व ३ हँडपंप आहेत. गावात प्रत्येक घरात नळ आहे परंतु तिथे केवळ ४ दिवसांनी १ तासचं पाणी येते. केवळ एकाच विहिरीतलं पाणी पेयजल म्हणून वापरले जाते व बाकी २ विहिरींचे पाणी उपयुक्त नाही. ग्रीन क्लबच्या विद्यार्थ्यांनी तिथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत देखील जाऊन मुलांमध्ये जल संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण केली. उंबरमाळीत बऱ्याचशा घरांमध्ये पाण्याचा पुनर्वापर केला जात असल्याची माहिती कळली. या सर्वेक्षणामुळे गावातील जलस्रोत व त्यांचा शाश्वत उपयोग ज्यामुळे पाण्याचा अपव्यय कमी होतो याबद्दलची महत्त्वपूर्ण माहिती कळली.

VPM चे के.जी. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी.बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे च्या Department - Department of Multimedia and Mass Communication ने महाविद्यालयाच्या वार्षिक वृत्तपत्र ऋTA चा प्रकाशन सोहळा दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजी १३८ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आयोजित केला. ह्या कार्यक्रमात वृत्तपत्रविषयक कामे व वृत्तपत्र बनवण्याचे प्रशिक्षण दिले गेले.

सामाजिक उत्तरदायित्व विभागाचा एक भाग म्हणून, NSS सह प्रतिभा आणि सांस्कृतिक समिती तर्फे उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेतील १२ विद्यार्थ्यांना (समितीच्या टीम गंधर्व'२४ च्या ८ विद्यार्थी सदस्यांनी, उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेतील ४० विद्यार्थ्यांसह (महिला-१७, पुरुष-२३) खालील सत्रे आयोजित केली.

१. मूलभूत साहित्यिक कौशल्ये (काजल घाटोळे द्वारे)

२. नाट्य उपक्रमांचा परिचय (हृतिक काळेकर यांनी)

३. मजेदार रेखाचित्र सत्र (प्रथमेश लोहकरे द्वारे)

४. क्रिएटिव्ह क्राफ्ट्स (त्रिवेणी त्रिपाठी द्वारे)

या शाळेतील विद्यार्थ्यांनी सत्राचा आनंद लुटला आणि त्यांच्या कौशल्यांमध्ये मोलाची भर घालण्यात आणि नवीन कौशल्ये शिकण्यास आनंद झाला.

जोशी बेडेकर महाविद्यालय व मुंबई विद्यापीठाच्या सांलग्नतेने जोशी बेडेकर महाविद्यालयात ऐतिहासिक किल्ले गोविंदगडावर ठाणे येथील जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या Diploma in Archaeology चे विद्यार्थी अभ्यास मोहिमेकरिता आले असता त्यांना 'राजे सामाजिक प्रतिष्ठान' या संस्थेच्या वतीने गोविंदगडाची भौगोलिक परिस्थिती, गडावर असलेल्या अवशेषांची माहिती आणि गडाचा इतिहास समजावून सांगण्यात आला. गडावर गडफेरी करत असताना प्रथम ठक्कर आणि रागिणी तारे या विद्यार्थ्यांना मंदिराकडे

जाताना डाव्या हाताला एक तोफेचा गोळा दिसून आला. जमिनीमध्ये असलेला हा गोळा त्यांनी आमच्या आणि अंकुर काणे सर यांच्या निदर्शनास आणून दिला. लगेचच रोहन राणे आणि सौरभ टाकळे यांनी तेथील माती बाजूला करून सदर चा गोळा बाहेर काढला असता उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचा आनंद गगनात मावेनासा झाला आणि खऱ्या अर्थाने आजची अभ्यास मोहीम सफल झाल्याचे समाधान विद्यार्थ्यांना लाभले होते. सदरच्या मोहिमेसाठी जोशी बेडेकर महाविद्यालयाचे प्राध्यापक, तसेच इतिहास अभ्यासक श्री अंकुर काणे, C.A. श्री योगेश प्रसादे, C.A. सौ. मधुरा जोशी, सौरभ टाकळे, रोहन राणे, प्रकाश बुरटे आणि विशाल राऊत आदी उपस्थित होते.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

**भौतिकशास्त्र विभाग** – भौतिकशास्त्र विभागातर्फे १४ डिसेंबर ते १६ डिसेंबर २०२३ रोजी ३ दिवसीय विज्ञान शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा शाळा आणि ज्युनियर कॉलेजमधील विज्ञान शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आली होती. ह्या कार्यशाळेचे प्रमुख वक्ते डॉ.परेश जोशी, डॉ.सौ. सुजाता हरल्क, कॅप्टन डॉ. शाशिभाल पांडे हे होते. ह्या कार्यशाळेत शिक्षकांना भौतिकशास्त्र विभागाने BASE शी जोडलेल्या प्रतिष्ठित व्यक्तींच्या अंतर्गत काम करण्याचा अनुभव सांगण्यात आले शालेय स्तरावरील शिक्षणातील प्रयोगांचे महत्त्व सहभागी शिक्षकांना समजवले. सहभागी शिक्षकांना विज्ञान प्रयोगांबद्दल भिन्न दृष्टीकोन शोधता आला. ह्या महोत्सवात एकूण ५१ शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते

३ जानेवारी २०२४ रोजी भौतिकशास्त्र विभागातर्फे बौद्धिक संपदा अधिकार (IPR) आणि लेझर ह्या विषयावर व्याख्यान भरवण्यात आले होते. ह्या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते श्री. पार्थ पांचाळ हे होते. हे व्याख्यान प्रथमवर्ष, द्वितीय वर्ष, तृतीया वर्ष आणि पदवीत्तर विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आले होते. ह्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र आणि लेसर तंत्रज्ञानाची माहिती मिळाली, लेसर तंत्रज्ञानाची मूलभूत तत्त्वे, ॲप्लिकेशन अवेअरनेस, इलेक्ट्रॉनिक्स ते हेल्थकेअरपर्यंतच्या विविध ॲप्लिकेशन्समधील या तंत्रज्ञानाचा वापर कसा केला जातो याबद्दल सखोल मार्गदर्शन मिळाले.  भविष्यातील संभाव्य नवकल्पनांबद्दल उत्सुकता वाढवते, बौद्धिक संपदा अधिकारांविषयी ज्ञान प्राप्त करणे इत्यादी बाबी ह्या सत्रातून विद्यार्थ्यांना समजल्या. ह्या सत्रात एकूण ३१ विद्यार्थी आणि ७ शिक्षक उपस्थित होते.




२६ फेब्रुवारी २०२४ रोजी भौतिकशास्त्र विभागातर्फे भौतिकशास्त्र महोत्सव प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीया वर्ष आणि पदवीत्तर विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आला होता. ह्या महोत्सवामुळे विद्यार्थ्यां मधील सर्जनशीलता वाढीस लागली, चौकटीच्या बाहेर विचार करण्याची प्रक्रिया सुरू झाली. विद्यार्थ्यांनी मनोरंजक पद्धतीने विषय अधिक प्रभावीपणे समजून घेतला आणि विद्यार्थी त्यांच्या समस्यांबद्दल वैज्ञानिक दृष्टिकोन कसे विकसित करतील हे गुण त्यांनी आत्मसात केले.. ह्या महोत्सवात एकूण ८४ विद्यार्थी आणि ८ शिक्षक उपस्थित होते.

२९ फेब्रुवारी २०२४ रोजी भौतिकशास्त्र विभागातर्फे डहाणू येथील अदानी थर्मल पॉवर प्लांटला एक दिवसीय औद्योगिक भेट देण्यात आली, ह्यावेळी विज्ञान शाखेची प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीया वर्ष आणि पदवीत्तर एकूण ४७ विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.



**गणित विभाग –** दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी गणित विभागातर्फे भित्तीपत्रिका स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला सौ. अनुश्री तांबे सहाय्यक प्राध्यापक गणित विभाग, के.जे. सौमैय्या अभियांत्रिकी महाविद्यालय या परीक्षक म्हणून लाभल्या होत्या. या स्पर्धेमध्ये कु. सुप्रिया जाधव हिला प्रथम पारितोषिक, कु. मृण्मयी ठाकूर हिला द्वितीय तर कु. श्रेया याडकीकर हिला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले.

**वनस्पतीशास्त्र विभाग –** वनस्पतीशास्त्र विभागातर्फे दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी मकर संक्रात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम वनस्पतीशास्त्र विभागात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीया वर्ष विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमामुळे सर्व विद्यार्थ्यांनी मकर संक्रांतीचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व जाणून घेतले यामध्ये उत्सवाशी संबंधित परंपरा, विधी आणि दंतकथा समजून घेतल्या. अनेक ठिकाणी मकर संक्रांतीचाही संबंध शेतीशी आहे. कापणीच्या हंगामाच्या संदर्भात या सणाचे महत्त्व, त्याचा शेतकऱ्यांवर होणारा परिणाम आणि त्याच्याशी संबंधित पारंपरिक कृषी पद्धती याविषयी विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. मकर संक्रांती ही तिळ आणि गूळ आधारित मिठाई यांसारख्या खास खाद्यपदार्थांसाठी ओळखली जाते हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. ह्या महोत्सवात एकूण ६३ विद्यार्थी आणि ५ शिक्षक उपस्थित होते.




वनस्पतीशास्त्र विभागातर्फे १५ जानेवारी २०२४ रोजी वनस्पतीशास्त्र विभागात –'12th Fail' हा मुव्ही दाखवण्यात आला. या चित्रपटात IPS अधिकारी मनोज कुमार शर्मा निर्भयपणे आपला शैक्षणिक प्रवास पुन्हा सुरू करतो व लाखो विद्यार्थी जगातील सर्वात कठीण स्पर्धा परीक्षेचा प्रयत्न करतात अशा ठिकाणी आपले नशीब पुन्हा मिळवण्याची कल्पना स्वीकारतात. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी चित्रपटाचा आनंद लुटला आणि स्पर्धा परीक्षांसाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले. हा कार्यक्रम प्रथम वर्ष, तृतीया वर्ष विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आला होता. ह्या महोत्सवात एकूण ६३ विद्यार्थी आणि ५ शिक्षक उपस्थित होते.

२७ फेब्रुवारी २०२४ रोजी वनस्पतीशास्त्र विभागातर्फे पालवी फेस्टचे वनस्पतीशास्त्र विभागात आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम प्रथमवर्ष, तृतीयावर्ष विद्यार्थ्यांन करिता आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांची उद्योजकता कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. उपक्रमादरम्यान विद्यार्थी सर्व खेळांमध्ये गुंतले होते. ह्या महोत्सवात एकूण ९९ विद्यार्थी आणि ५ शिक्षक उपस्थित होते.



सुखापेक्षा दु:खामुळे होणारे ज्ञान श्रेष्ठ दर्जाचे असते!

**प्राणीशास्त्र विभाग –** प्राणीशास्त्र विभागातर्फे २० जानेवारी २०२४ रोजी वनस्पतीशास्त्र विभागात –पेंग्विन जागरूकता दिवस साजरा करण्यात आला. पेंग्विनबद्दल मौल्यवान माहिती विद्यार्थी व शिक्षकांना मिळाली आकर्षक प्राण्यांची अधिक माहिती मिळाली व त्यांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी जबाबदारीची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आली. ह्या महोत्सवात एकूण ४१ विद्यार्थी आणि ५ शिक्षक उपस्थित होते.

प्राणीशास्त्र विभागातर्फे १५ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०२४ रोजी वनस्पतीशास्त्र विभागात Zoomagica-प्राणीशास्त्र महोत्सव साजरा करण्यात आले होते. ह्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कार्यक्रम हाताळण्याची व व्यवस्थापित करून आयोजित करण्याची संधी मिळाली, विद्यार्थी सांघिक भावना आणि समन्वय शिकू शकले, विद्यार्थ्यांना तेथे कलागुण दाखविण्याची संधी मिळाली. ह्या महोत्सवात एकूण ६५ विद्यार्थी आणि ७ शिक्षक उपस्थित होते.

प्राणीशास्त्र विभागातर्फे १३ फेब्रुवारी २०२४ रोजी वनस्पतीशास्त्र विभागात 'पीअर टू पीअर' लर्निंग सत्र आयोजित करण्यात आले होते. ह्या सत्रात प्रमुख वक्त्या प्राणीशास्त्र विभागाच्या माजी विद्यार्थी कु.श्रीष्टी यादव ह्या विद्यार्थ्यांना लाभल्या होत्या. ह्या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांचे ज्ञान मिळाले व त्यांच्या आगामी कारकिर्दीसाठी स्वतःला तयार करण्यास त्यांना प्रेरणा मिळाली. हा उपक्रम तृतीया वर्ष विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आला होता. ह्या महोत्सवात एकूण ३३ विद्यार्थी आणि ४ शिक्षक उपस्थित होते.

प्राणीशास्त्र विभागातर्फे १७ फेब्रुवारी २०२४ रोजी पतंजली सभागृहात 'मेंटल वेल बिंग आणि बिहेविअर विज्ञान' ह्या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ह्या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव झाली, ते जीवनातील सामान्य तणावाचा सामना कशा प्रकारे करू शकतात ह्याची कल्पना त्यांना मिळाली व समाजात चांगले योगदान देण्यास सक्षम असल्याची कौशल्ये त्यांच्यात रुजवण्यात आली. ह्या महोत्सवात एकूण ७६ विद्यार्थी आणि ९ शिक्षक उपस्थित होते.

**ग्रंथालय विभाग –** १९ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजयंती ग्रंथालय विभागात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांवरील माहितीचे प्रदर्शन व पुस्तकांचे प्रदर्शन ग्रंथालय विभागात भरवण्यात आले होते. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

२६ फेब्रुवारी २०२४ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त ग्रंथालय विभागात स्वातंत्र्यवीर सावरकर यांवरील माहितीचे प्रदर्शन, तसेच त्यांनी लिहिलेल्या व त्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कार्याची माहिती दिली.

२७ फेब्रुवारी २०२४ रोजी 'मराठी भाषा गौरव दिना' निमित्त मराठीतील थोर लेखक, तसेच औषधी वनस्पती बाबत मराठी पुस्तकाचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.




२८ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त जगप्रसिद्ध वैज्ञानिकांचे पुस्तकांचे, तसेच विज्ञानातील महत्त्वाचे संदर्भ ग्रंथांचे प्रदर्शन ग्रंथालय विभागातर्फे आयोजित करण्यात आले होते. तसेच २०२४ हे वर्ष युनायटेड नेशन्स तर्फे International Year of Comelids म्हणून घोषित करण्यात आले आहे.

त्यानिमित्ताने Comelids बद्दल माहिती व भित्तीपत्रिका प्रदर्शित करण्यात आली होती.



**मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा**

एकीकडे मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न व आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी भाषा व संस्कृती यांचा उमटत असलेला ठसा, या पार्श्वभूमीवर बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त एका आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या मध्ये ज्येष्ठ सामाजिक कवी श्री. किरण सोनवणे व मराठी भाषेच्या अभ्यासक व कवितेच्या वाटेवर या कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्रातील मनामनांत पोहोचलेल्या साधना जोशी यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. मराठी अभिमान गीताने सुरुवात झालेल्या या कार्यक्रमात कुमारी आश्लेषा भोसले यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. बिपीन धुमाळे यांनी केले व आपणच मराठीचा वापर रोजच्या दैनंदिन जीवनात करून आग्रह धरायला हवा असे आवाहन केले, त्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनी बारा मैलावर भाषा कशी बदलते याचे उदाहरणे, दाखले देऊन काही बोलीचे सादरीकरण पेश केले.

प्रथम सौ. साधना जोशी यांनी आपल्या गाजलेल्या कवितेच्या वाटेवर या गाजलेल्या कार्यक्रमाचे सादरीकरण केले, यामध्ये त्यांनी कवितेत व्युत्पत्ती पासून ते संत परंपरेत जनमानसात लोकप्रिय आहेत अशा रचना, त्यांचा अन्वयार्थ, लोकसाहित्य, प्रेम कविता, विडंबन काव्य, उपहासात्मक कविता, विनोदी लेखन इत्यादी कंगोरे रसिक विद्यार्थ्यांना उलगडून दाखवले, व आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या शैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत मनमुराद हसवून अंतर्मुख होऊन विचार करायला लावला.

त्यानंतर ज्येष्ठ कवी श्री. किरण सोनवणे यांच्या गीतांचा कार्यक्रम सादर झाला, यामध्ये त्यांनी प्रेम कविता, सामाजिक भान असणाऱ्या कविता, नशाबंदी वरील कविता, अशा विविध प्रकारच्या रचना आपल्या खणखणीत आवाजात सादर केल्या.

याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेचे ५ विद्यार्थी सैन्य दलात दाखल झाले म्हणून देवेश शुक्ला, मनीष दाभाडे, ओंकार चोरट, आशिष गुजर, रोहन देवकर, या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या वेळी गोंधळ नृत्य सादर केले व अकरावीच्या विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या दोन कविता सादर केल्या.

यानिमित्ताने एका अनोख्या पद्धतीने आयोजित केलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचा आस्वाद विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले,

याप्रसंगी, उपप्राचार्य, सौ. सुनीता ढाकणे, भाषा मंडळ समन्वयक प्रा. अनिल आठवले, साहित्य सहवास समन्वयक, प्रा. सुधीर भोसले, ग्रंथपाल डॉ. कादंबरी मांजरेकर, रसायन शास्त्र विभाग प्रमुख, डॉ. अनिता गोस्वामी व प्रा. बालाजी घुगे, निवृत्त प्राध्यापक, डॉ. सुदेश राठोड, डॉ. प्रकाश माळी, पदार्थ विज्ञान शास्त्राचे प्रा. सुनील भुसारा, तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आणि अकरावीचे सर्व तुकडीतील

विद्यार्थी हजर होते. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.



**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी सत्र - II आणि सत्र - IV च्या विद्यार्थ्यांकरिता अभिमुखता कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता अभ्यासक्रमाची उद्दिष्टे आणि अभ्यासक्रमाच्या परिणाम अंतर्गत मूल्यमापन अंतिम सूचना ह्या वेळी विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

**बार कौन्सिल ऑफ इंडिया नोंदणी**

बार काउन्सिल ऑफ इंडिया यांच्या सूचनेप्रमाणे विधी महाविद्यालयाने नोंदणी केली. यावेळी महाविद्यालयाशी संबधित सर्व माहिती आवश्यक त्या कागदपत्रासह पुरविण्यात आली. देशातल्या सर्व विधी महाविद्यालयास बीसीआय या पालक संस्थेची मान्यता व परवानगी आवश्यक असते. विधी महाविद्यालयास त्याच्या स्थापनेपासून तशी मान्यता आहे व वेळोवेळी सुचनेनुसार ती पुन्हा पुरवली जाते.

**२९ फेब्रुवारी रोजी NAAC चे सर्टिफिकेट महाविद्यालयाला प्राप्त झाले**

१४ व १५ डिसेंबर २०२३ रोजी नॅकच्या समितीने महाविद्यालयाची तपासणी करून महाविद्यालयास 'ब' हा ग्रेड प्रदान केला होता. नुकतेच नॅक या संस्थेकडून महाविद्यालयास प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

- **प्रथम विधीसाठीची फ्रेशर्स स्पर्धा**

गुरुवार दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात प्रथम वर्ष विधी च्या विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धा पुढीलप्रमाणे होत्या:- १. वक्तृत्व २. वादविवाद ३. मूट कोर्ट

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ५.०० वाजता प्रा. हेतल मिशेरी यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली ज्यात त्यांनी तिन्ही स्पर्धांचे आयोजन करण्यामागील उद्देश, त्यांचे नियम आणि त्यासाठीच्या परीक्षकांची नावे जाहीर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रफुल्लचंद्र दुबे (FYLLB) यांनी केले.

**वक्तृत्व स्पर्धा –** न्यायाधीश – प्रा.समता जोशी(वेळ – प्रत्येकी ३ मिनिटे)

विषय – १) मेरी माती मेरा देश २) नवीन कामगार संहिता ३) भयानक रस्ते अपघात

स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे: १)श्री व्यंकटेश अय्यर २) श्री. वीरेंद्र भाटिया ३. कु. हेमलता मावरी ४) श्री. नईम शेख ५) मिहीर घांगरेकर ६) कु. तेजल सावंत ७) श्री प्रफुल्लचंद्र दुबे

**वादविवाद स्पर्धा –** न्यायाधीश – प्रा. कृष्णा कामथ (वेळ – प्रत्येकी ३ मिनिटे)

विषय – १) कायदेविषयक व्यवसायासाठी 'एआय' वरदान आहे की नुकसान?

२) मुंबई विद्यापीठांतर्गत एलएलबी विद्यार्थ्यांसाठी मराठी हा अनिवार्य विषय असावा का ?

स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे: १) श्री. महानंदा सावने २) श्री. रवी घुले ३) श्री. अजय चव्हाण ४) कु. शर्मिला तोडकर ५) कु. सिमरन विचारे ६) श्री. व्यंकटेश अय्यर ७) कु. वैष्णवी तेलंग ८) श्री. विनोद आघाणे

**अभिरुप न्यायालय स्पर्धा (Moot Court) –** न्यायाधीश – प्रा.अंबर जोशी (प्रत्येकी वेळ – ५ ते ७ मिनिटे)

स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे:
१) श्री. वीरेंद्र भाटिया २) श्री अजय चव्हाण ३) श्री. उदय शिरसाळकर ४) श्री. सचिन लवंगारे ५) श्री व्यंकटेश अय्यर ६) कु. किरण सिहाग ७) कु. वैष्णवी तेलंग ८) श्री प्रफुल्लचंद्र दुबे

न्यायाधीशांनी सायंकाळी ७ वाजता निकाल जाहीर केला. विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे:–

| | | |
|---|---|---|
| वादविवाद स्पर्धा | प्रथम | कु.शर्मिला तोडकर |
| | द्वितीय | कु.वैष्णवी तेलंग |
| | तृतीय | श्री.अजय चव्हाण |
| वक्तृत्व स्पर्धा | प्रथम | कु.हेमलता मावरी |
| | द्वितीय | कु.तेजल सावंत आणि श्री.प्रफुल्लचंद्र दुबे |
| | तृतीय | श्री.व्यंकटेश अय्यर |
| मूट कोर्ट | प्रथम | सचिन लवंगारे |
| | द्वितीय | श्री.उदय शिरसाळकर |
| | तृतीय | श्री.प्रफुल्लचंद्र दुबे आणि श्री.वीरेंद्र भाटिया |

प्रा. विनोद वाघ यांनी आभार व्यक्त केले तर श्री. प्रफुल्लचंद्र दुबे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**ॲड ऑन सर्टिफिकेट कोर्स 'कला, नाट्य आणि कायदा जागृती'**

विद्या प्रसारक मंडळाचे टी एम सी विधी महाविद्यालय, ठाणे यांनी प्रथम विधीच्या सत्र–एक साठी ऍड ऑन सर्टिफिकेट कोर्स कला, नाट्य आणि कायदा जागृती या अभ्यासक्रमाची सुरुवात २०२४–२०२५ या शैक्षणिक वर्षांपासून केली आहे. संपूर्ण भारतामध्ये अशा प्रकारचा अभ्यासक्रम असलेला हा कदाचित पहिलाच प्रयत्न असेल. या अभ्यासक्रमामध्ये विधीच्या विद्यार्थ्यांना कायदेविषयक जागृती करण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य शिकविले गेले. अभ्यासक्रमामध्ये विधी साक्षरता अभियान संबंधीचा कायदा, इतिहास विविध न्याय निवाडे. विधी जागृतीसाठी चित्र काढणे, पथ नाट्य सादरीकरण, प्रवसन लिहिणे असा प्रकारे विविध पद्धतीने प्रशिक्षण दिले गेले. यासाठी प्रा. विनोद एच वाघ, ओंकार अय्यर, ओंकार पोकले यांनी प्रशिक्षण दिले. या अभ्यासक्रमासाठी जवळपास २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला परंतु २५ विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला. दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या २५ विद्यार्थ्यांना, मराठी सिनेक्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेत्री अश्विनी कासार यांच्या हस्ते सर्टिफिकेट वितरित करण्यात आले.

**ॲड ऑन सर्टिफिकेट प्रोग्राम इन रिअल इस्टेट लॉ (बॅच–२)**

'रियल इस्टेट कायदे' चे व्याख्याने ७ ऑक्टोबर २०२३, शनिवार पासून सुरू झाले. संसाधन व्यक्ती म्हणून ॲड. दीपक शेगावकर ची नेमणूक केली होती. व्याख्यान महाविद्यालयात दर शनिवारी सायंकाळी ७.०० ते ८.३० या वेळेत होते. अभ्यासक्रमाचा कालावधी एकूण ३० व्याख्यानांचा होता. परीक्षा घेण्यात आली आणि विद्यार्थ्यांना वर्ग चाचण्यांसह प्रकल्प सादर करण्यास सांगण्यात आले. निकाल २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी घोषित करण्यात आला. एकूण १६ विद्यार्थ्यांनी O ग्रेड आणि उर्वरित A + ते B + मधून गुण मिळवले.

के.सी.लॉ कॉलेजच्या आंतरराष्ट्रीय सेमिनारचे पेपर सादर करण्यात आले तसेच आमच्या प्राध्यापकांचे खालील पेपर्स आंतरराष्ट्रीय सेमिनारसाठी स्वीकारले गेले आहेत.

- संविधानाची गडद बाब: न्यायालयाद्वारे कार्यकर्ता पुनरावलोकनाद्वारे भारतातील घटनावादाचे समकालीन

रूपरेषा (Constitution's Dark Matter: Contemporary Contours of Constitutionalism in India through -ctivist Review by the Court) डॉ. श्रीविद्या जयकुमार, सहयोगी प्राध्यापक आणि प्रभारी प्राचार्या, वि.प्र.मं.चे टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे

- गंभीर अभ्यास: आंतरसांस्कृतिक विवाह, भारतीय कायदे आणि घटनात्मक तरतुदींमध्ये मुलांचा ताबा. (Critical Study: Custody of children in intercultural marriages, Indian Laws and Constitutional provisions.) – हेतल मिशेरी, सहाय्यक प्राध्यापक

- भारतातील ट्रान्सजेंडर्ससाठी शिक्षणाच्या अधिकाराचे गंभीर विश्लेषण (Critical Analysis of Right to Education for Transgender in India) – कृष्णा कामत, सहाय्यक प्राध्यापक

१४ फेब्रुवारी रोजी एस.डी.लॉ कॉलेज पालघरमध्ये विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) कमिटी म्हणून उपस्थित होत्या.

२ फेब्रुवारी रोजी विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार LIC प्रथमच संलग्नतेसाठी उपस्थित होत्या.

**विधीमंथन क्रीडा दिन :** दिनांक ९ व १० फेब्रुवारी महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रांगणात ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता कार्यक्रमाची सुरुवात क्रिकेट कार्निवलने झाली. मुले व मुली अशा दोन्ही संघांनी क्रिकेट मध्ये सहभाग घेतला स्पर्धेत विजयी झालेले संघ पुढील प्रमाणे :-

क्रिकेट विजते पुरुष संघ :-
१. विधी द्वितीय वर्ष संघ-हर्षल भालके (कर्णधार )
२. विधी तृतीय वर्ष संघ-सुरज काढणें (कर्णधार )

क्रिकेट विजते स्त्री संघ :-
१. विधी तृतीय वर्ष संघ – साक्षी कुमावत (कर्णधार)
२. विधी प्रथम वर्ष संघ – हर्षिता राव (कर्णधार)

क्रिकेट स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू :-
विधी तृतीय वर्ष विद्यार्थी – सुरज काढणें
विधी प्रथम वर्ष विद्यार्थी – हर्षिता राव

**इतर स्पर्धांमधील विजेते खेळाडू**

| **खेळाचे नाव** | **विजेते (पुरुष)** | **विजेते (स्त्री)** |
|---|---|---|
| कॅरम (पुरुष/स्त्री) | अनिल पवार(SY)<br>हर्षल भालके(SY)<br>निरंजन देशपांडे(SY) | पूर्वा मोंडकर(TY)<br>हर्षिता राव(FY)<br>अंजली चौबे(SY) |
| बुद्धिबळ (पुरुष/स्त्री) | प्रवेष सत्रा(FY)<br>तेजस पाटील (SY)<br>अनिकेत शिंदे (FY) | सिद्धी गवस (SY)<br>साक्षी कुमावत(TY)<br>इशा ओडेकर(SY) |
| टेबल टेनिस (पुरुष/स्त्री ) | विकास गुप्ता(FY)<br>रतनसिंग चव्हाण(SY) | अपर्णा बोरकर(SY)<br>अंजली चौबे(SY) |
| टेबल टेनिस खेळाडू संघ | आकाश दामा आणि विकास गुप्ता | |
| टेबल टेनिस खेळाडू मिश्र संघ | अपर्णा बोरकर आणि ओमकार सोनावणे | |
| बॅडमिंटन (पुरुष/स्त्री) | ओमकार सोनावणे(FY)<br>सचिन मिश्रा(FY) | अनुराधा दुबे(TY)<br>राचेल डिसुझा(TY) |
| रस्सीखेच संघ (पुरुष/स्त्री) | लक्ष्मीकांत लवाटे,<br>स्मिथ घाडगे<br>शुभम कोडरे,<br>सचिन मिश्रा | पूर्वी महाडिक,<br>सानिया रावले,<br>हर्षिता राव,<br>ज्ञानेश्वरी शिंदे,<br>विरजा शिंदे,<br>आरती लावंड,<br>किरण सिह्ग,<br>महानंदा सावणे. |

**२४ फेब्रुवारी राष्ट्रीय परिसंवाद : Legal Protection and Improvement of the Environment: Challenges and the way forward**

दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ वाजे दरम्यान Legal Protection and Improvement of the Environment : Challenges and the way forward या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. विद्या प्रसारक मंडळाचे टीएमसी विधी महाविद्यालय, विज्ञान महाविद्यालय व पॉलिटेक्निक महाविद्यालय यांनी संयुक्तपणे हा परिसंवाद आयोजित केला होता. मुबंई उच्च न्यायालय व राष्ट्रीय हरित अधिकरणचे माजी न्यायमूर्ती श्री यु डी साळवी यांच्या हस्ते या परिसंवादाचे उद्धाटन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय हरित अधिकरण चे एक्सपर्ट सदस्य डॉ. कुलकर्णी, माजी सदस्य डॉ. देशपांडे, विप्रमंचे कार्यकारी सदस्य डॉ. महेश बेडेकर, माजी प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर आणि तिन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीविद्या जया कुमार, डॉ. डि के नायक आणि डॉ. विंदा मांजरमकर उद्‌घाटकीय सत्रासाठी उपस्थित होते. यावेळी श्री. साळवी यांनी उद्धाटकीय भाषण केले व पर्यावरण कसे संतुलित असले पाहिजे व यासाठी असलेला कायद्यावर भाष्य केले. डॉ. कुलकर्णी यांनी 'An Introspection for More Effective Environmental Adjudication' या विषयावर बोलताना, पर्यावरण हा विषय कसा प्रत्येक अभ्यास शाखेशी जोडला गेलेला आहे याचे विवेचन सांगितले. दुसरे सत्र हे राष्ट्रीय हरित अधिकरणाच्या एकुण कायदा, अधिकार पद्धती, खटले व प्रक्रिया या विषयावर होते. यावर भाष्य करण्यासाठी पाच अधिवक्त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये श्री. रघुनाथ महाबल, श्री. अनिरुद्ध कुलकर्णी, श्रीमती. मानसी जोशी व श्रीमती सुप्रिया डांगरे, श्री. सौरभ कुलकर्णी यांनी सहभाग घेऊन अनेक प्रश्नांची उत्तरे दिलीत. दुपारच्या जेवणानंतर तिसरे सत्र घेण्यात आले. यापुर्वी विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. नीतिन वाघ यांनी त्यांच्या शोध पेपर सादर केला. डॉ. अजय देशपांडे यांनी Intersectional challenges of Law and Science for Effective Enforcement of Environmental Regulations' या विषयावर व्याख्यान दिले तसेच प्रा. अमित यादव यांनी 'वेस्ट मॅनेजमेंट' या विषयावर व्याख्यान दिले. चौथ्या सत्रामध्ये श्री. मित अशार यांनी 'वाईल्ड लाईफ कन्सर्वेशन' या विषयावर तर डॉ. प्रशांत मनुरकर यांनी एनर्जी सेविंग या विषयावर व्याख्यान दिले. सांयकाळी ५.३० वाजता शेवटचे सत्र घेण्यात आले यावेळी श्रीमती निलाक्षी सागवेकर यांनी व्याख्यान दिले. डॉ. विंदा मांजरमकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. पसायदान या गीताने या राष्ट्रीय परिसंवाद ची सांगता करण्यात आली.

**२८,२९ फेब्रुवारी NEP कार्यशाळा : प्रशिक्षकाला प्रशिक्षित करा**

NEP २०२० सेन्सिटायझेशन: प्रशिक्षकाला प्रशिक्षित करा ह्या विषयावर विद्या प्रसारक मंडळाचे के.जी.जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी.बेडेकर वाणिज्य महाविद्यालय ह्यांच्या द्वारे २ दिवस प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार ह्यांनी सहाय्यक प्राध्यापक श्री विनोद वाघ, कु.हेतल मिशेरी तसेच ग्रंथपाल शीतल सोनावणे ह्यांच्या समवेत सदर कार्यक्रमात सहभाग घेतला.

**प्रशिक्षण कार्यक्रमात शिक्षकांचा सहभाग : संशोधन प्रशिक्षण कार्यक्रम**

मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयाने २६ फेब्रुवारी ते २ मार्च २०२४ पर्यंत आंतरशाखीय संशोधन पद्धती या एका आठवड्याच्या अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. अस्मिता ए. वैद्य यांच्या नेतृत्वाखाली केले होते. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या

उद्दिष्टांमध्ये संशोधन प्रयत्न सुरू करण्यापूर्वी संशोधन प्रक्रियेच्या तांत्रिक बाबी समजून घेणे. सहभागींना संशोधनातील बारकावे समजून त्याशी परिचित होणे समाविष्ट होते. आमच्या महाविद्यालयातील शिक्षिका कु.कृष्णा कामत ह्यांनी ह्या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेत तो यशस्वीरित्या पूर्ण केला.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२४, मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने विद्या प्रसारक मंडळाचे टि एम सी विधी महाविद्यालयाने मराठी राजभाषा दिवसमोठ्या जल्लोशात साजरा केला. मराठी राज्यभाषा दिनानिमीत्त महाविद्यालयातील विधी अभ्यासक्रमात शिकत असलेले प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांच्या विद्यार्थांनी जय शिवराय ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनांवर आधारित नाटिका सादर केली. ह्या नाटिकेत जवळपास ४० विद्यार्थांचा सहभाग होता. ह्या नाटिकेत बाल शिवरायांची भूमिका विद्यार्थीनी पूर्वा तर मोठेपणातली भूमिका प्रतीक जगताप ह्यांने निभावली. नाटिकेचे दिग्दर्शन, लेखन हे मनिषा झिटे या तृतीय वर्षाचा विद्यार्थिनीने केले होते. ह्या नाटिकेत छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव, महारांजाचे गुरू मॉ जिजाऊ, संत तुकाराम यांचे संस्कार, युद्ध कला, तलवारबाजी, रायरेश्वराची शपथ, तोरणाची लढाई, तसेच महाराजांची सामाजिक व शेतीविषयक धोरणे व कायदेपद्धती, अफजलखानाचा वध, आग्राहून सुटका व राज्याभिषेक सोहळा ह्या घटना सादर करण्यात आल्या होत्या. ही नाटिका विद्याप्रसारक मंडळाच्या थोरले बाजिराव पेशवे ह्या सभागृहात पार पडली. यावेळी विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थी हजर होते. अक्षय राउत या विद्यार्थ्याने शिवाजी महाराजावर मनस्पर्शी असे भाषण दिले. प्रसिद्ध मराठी अभिनेत्री आश्विनी कासार यावेळी उपस्थित होत्या. या शिवाय मराठी भाषा दिनानिमित्त मराठी गाणी, कविता, लावणी व इतर सांस्कृतिक कार्यक्रम यांचेही सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जया कुमार, प्रा. विनोद एच वाघ व सर्व शिक्षक वर्ग, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे मोलाचे योगदान दिले.

**विधी मंथन सांस्कृतिक कार्यक्रम २०२४**

महाविद्यालयात वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम २६ व २७ फेब्रुवारी पार पडले. दिनांक २६ फेब्रुवारी रोजी विविध स्पर्धा घेण्यात आल्या स्पर्धा व त्यांचे निकाल खालीलप्रमाणे:

**रांगोळी स्पर्धा :** पहिले पारितोषिक - मयुरी कलान (तृतीय वर्ष), द्वितीय पारितोषिक - निकिता तलेशा (टीवाय), तृतीय पारितोषिक - योगिता हुलवान (एसवाय)

**मेहेंदी स्पर्धा :**

पहिले पारितोषिक-दिशा विजय सोलंकी (प्रथम वर्ष)

द्वितीय पारितोषिक-गिरीजा हनुमंत बारगजे (प्रथम वर्ष)
तृतीय पारितोषिक-निकिता पन्नालाल तलेशा(तृतीय वर्ष)

**खाद्य स्पर्धा :** तुम्ही जितके करू शकता तितके खा - ओंकार सुब्रमण्यम अय्यर(तृतीय वर्ष)

**छायाचित्रण स्पर्धा :** प्रथम पारितोषिक- मानसी गायकर (प्रथम वर्ष), द्वितीय पारितोषिक - वैभव ठाकूर (द्वितीय वर्ष), तृतीय क्रमांक - दर्शन कासारे (द्वितीय वर्ष)



**रील्स बनवणे स्पर्धा:** प्रथम पारितोषिक - जयश्री धर्माधिकारी (तृतीय वर्ष),
द्वितीय क्रमांक - राहुल वेश्वीकर (प्रथम वर्ष)

ट्रेझर हंट विजेता संघ - ब्लू सदस्य खालीलप्रमाणे :- १) महानंदा सावणे (FY) २) अक्षय राऊत (TY) ३) शुभदा काळे (SY) ४) वैभव ठाकूर (SY) ५) अंकुश (FY) ६) ऊर्मिला जाधव (SY) ७) गीत बनारसे (SY) ८) देवयानी पवार (TY)
सर्व स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन !

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**विज्ञान प्रदर्शन कार्यक्रम:** २४ फेब्रुवारी २०२४ रोजी, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभाग व्हीपीएम पॉलिटेक्निक तर्फे ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. सी.व्ही. यांच्या जयंतीनिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भाभा अणुसंशोधन केंद्र (BARC) चे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. आर.डी. कुलकर्णी होते. सकाळी ११:०० वाजता सुरू झालेले हे प्रदर्शन सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी खुले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक आणि विभाग प्रमुख डॉ. कीर्ती आगाशे आणि शास्त्रज्ञ डॉ. आर. डी. कुलकर्णी यांना विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रकल्प समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मॉडेल्सचे कार्य स्पष्ट करण्यासाठी व्हिज्युअल प्रेझेंटेशन देखील तयार केले होते. विद्यार्थ्यांनी स्मार्ट ग्रीकल्चर सिस्टम, ड्राय कॅबिनेट, गॅस लीकेज डिटेक्टर, ऑर्डिनो वापरणे, पाण्याची गुणवत्ता मोजणे, हवामान निरीक्षण प्रणाली, आयओटी आधारित स्मार्ट होम ऑटोमेशन, वायरलेस ब्लॅक बॉक्स, पॉसनेट वापरून पोश्चर डिटेक्शन, फायर फायटिंग रोबोट आणि आयओटी आधारित मॉड्यूलर होम ऑटोमेशन यासह विविध मॉडेल्सचे प्रदर्शन केले. डॉ. आर.डी. कुलकर्णी यांनी मॉडेल्सचे योग्य मूल्यमापन केले. डॉ. आर. डी. कुलकर्णी सरांनी विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या विविध मॉडेल्सचे आणि विद्यार्थ्यांच्या प्रशंसनीय प्रयत्नांचे कौतुक केले. विद्यार्थी वर्गाला अनेक मोलाच्या सूचना देऊन या प्रोजेक्ट चे व्यावसायिक रूपांतर कसे करता येईल यावर मोलाचे मार्गदर्शन केले.



**Project Exhibition / Competition -** दरवर्षीप्रमाणे या वर्षीही २५ फेब्रुवारी २०२४ रोजी माहिती आणि तंत्रज्ञान विभागातर्फे 'Science Day' ह्या दिवशी तृतीय वर्ष पदविका विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या प्रकल्पाचे प्रदर्शन व स्पर्धा आयोजित केली होती. ह्यामध्ये विद्यार्थ्यांना तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात शिकवलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित केलेले प्रकल्प इतरांसमोर सादर करण्याची संधी मिळाली.

विविध तंत्रज्ञानांनी विकसित केलेले प्रकल्प जसे Website, IOT based applications, mobile app Robotic या प्रदर्शनात सादर करण्यात आले होते.

तंत्रनिकेतनाच्या इतर विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच तीनही वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे संगणक विभागातील अध्यापक श्री. तेजस जाधव उपस्थित होते. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे प्रकल्प बघून योग्य मार्गदर्शन केले.

या सर्व प्रकल्पांमध्ये तृतीय वर्षाच्या ६८ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या उपक्रमामुळे प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या वापर करून सुचण्यासाठी प्रेरणा मिळाली. सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहभागाने हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

**मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन**

मराठी भाषा गौरव दिन हा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्रच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून व कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी, २०१३ रोजी घेण्यात आला. कुसुमाग्रजची मराठी साहित्य क्षेत्रात नाटककार, कथाकार, कादंबरीकार, कवी आणि समिक्षक म्हणून ख्याती आहे. मराठीचा सन्मान वाढविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.





**मराठी हस्ताक्षर स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग**

दरवर्षी वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे येथील ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. या दिनानिमित्त ह्या वर्षी मराठी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली होती. दि. २७ फेब्रुवारी या दिवशी दुपारी १.३० ते २.०० या वेळेत ग्रंथालयातील वाचन कक्ष येथे ही स्पर्धा पार पडली. सदर स्पर्धेत विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्व स्पर्धकांना एक उतारा लिहून काढायचा होता. त्यासाठी प्रत्येकाना एक एक मराठी पुस्तक देण्यात आले होते. त्यानिमित्ताने मराठी पुस्तकाची ओळख होत होती. सध्या तंत्रज्ञान युगात लेखन कमी झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची आवड निर्माण व्हावी आणि सुवाच्य लेखन सराव व्हावा. हा त्यामागचा प्रमुख उद्देश होता.

जवळ – जवळ ८५ स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये ९ स्पर्धक हे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी होते. बऱ्याच जणांचे सुंदर हस्ताक्षर असल्याने परीक्षक डॉ. प्रा. कीर्ती आगाशे (विभाग प्रमुख IE Dept.) यांची क्रमांक काढण्यासाठी कसोटी लागण्याची शक्यता आहे. सदर स्पर्धा यशस्वी होण्यासाठी ग्रंथालयीन स्टाफ श्री. चंद्रकांत शिंगाडे, सौ. प्रज्ञा दळवी, श्रद्धा जाधव आणि संतोष बारगोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**२८ फेब्रुवारी २०२४ : राष्ट्रीय विज्ञान दिवस – प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा –**

आजचे विज्ञान, उद्याचे तंत्रज्ञान या उक्तीप्रमाणे विज्ञानाला तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर बऱ्याच गोष्टी शक्य करता येतील. आज संपूर्ण जग विज्ञानावर अवलंबून आहे म्हणूनच आच्या युगाला विज्ञानाचे युग म्हटले जाते कारण विज्ञानाने बऱ्याच गोष्टी सोप्या केल्या आहेत.

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये दिनांक २८/०२/२०२४ रोजी विज्ञान दिनाचे औचित्य साधून प्रथम वर्ष पदविका विभाग व आय आय सी सेलच्या वतीने प्रकल्प प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रथम वर्षाच्या सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. एकूण १५ प्रकल्प प्रदर्शित करण्यात आले होते.

प्रदर्शनाची सुरुवात दुपारी १.४५ वाजता झाली. तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.के. नायक तसेच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी या प्रदर्शनास भेट दिली. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील मुलांनीही या प्रदर्शनास भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.

एकूण १५ प्रकल्प प्रदर्शित करून विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक व नाविण्यपूर्ण कल्पना सर्वांसमोर मांडल्या. होलोग्राम टेम्परेचर सेंटर, रिन्युएबल एनर्जी सिस्टीम, लायफाय टाइपस ऑफ मोशन, चंद्रयान, ए.सी. करंट डिरेक्टर, कंडक्टीवीटी अशा प्रकारचे अनेक प्रकल्प प्रदर्शित करण्यात आले होते.

परीक्षणाचे काम सौ. गौतम पुजारे, सौ. राजश्री पाटील व सौ. स्मिता खंडागळे यांच्यामार्फत करण्यात आले. डॉ. सौ. इंगवले यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व परिक्षकांचे आभार मानले तसेच त्यांना प्रोत्साहन दिले.

| **विजेते विद्यार्थ्यांची नावे** | **विषय** |
|---|---|
| १) मोक्षजय मुकादम<br>२) ओमकार आवळे<br>३) ओम चाळके<br>४) तन्मय शिंदे<br>५) आदिनाथ माने | रिन्युएबल एनर्जी सिस्टीम |
| १) इश्मित गुप्ता<br>२) रिषभ दुबले | लायफाय टेक्नॉलॉजी |
| १) आदित्य सोनार<br>२) तेजस विरले<br>३) यश अहेर | ए.सी. करंट डिरेक्टर |
| उत्तेजनार्थ १) कुणाल मुळीक<br>२) हिमांशू घरत | टेम्परेचर सेंसर<br>कंडक्टीवीटी |

**राष्ट्रीय विज्ञान दिन प्रदर्शनाचा अहवाल –**

VP M's Polytechnic, Thane च्या इन्स्टिट्यूट इनोव्हेशन कौन्सिलने २८ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त एक प्रदर्शन आयोजित केले होते.

दैनंदिन जीवनात विज्ञानाच्या महत्त्वाविषयी जागरुकता निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक वृत्ती जागृत करण्यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या दिवशी विद्यार्थ्यांनी साध्या विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित त्यांच्या सर्जनशील आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प, मॉडेल्ससह कल्पनांचे प्रदर्शन केले. हे कार्यरत मॉडेल्स आणि प्रकल्प त्यांच्या विविध क्षेत्रातील आणि तंत्रज्ञानातील एकूण ज्ञानावर आधारित होते. विविध विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि प्रोजेक्ट्स, वर्किंग मॉडेल्स, पोस्टर्स आणि प्रात्यक्षिकांच्या स्वरूपात त्यांच्या कल्पना स्पष्ट केल्या. विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे संस्थेचे प्राचार्य डॉ. डी के नायक, प्रथम वर्ष प्रभारी डॉ. जी.एस. इंगवले यांनी निरीक्षण केले आणि त्यांचे कौतुक केले.



प्रदर्शनाचे परीक्षण श्रीमती गौतमी पुजारे, सौ. स्मिता खंडागळे, सौ. राजश्री पाटील यांनी केले आणि सर्व सादरीकरणातून तीन उत्कृष्ट मॉडेल निवडण्यात आले.

**Project Exhibition Report of Instrumentation Department**

दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी भारतामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त, विद्याप्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे येथील, इन्स्ट्रुमेंटेशन

विभागाने २८ फेब्रुवारी २०२४ रोजी विज्ञान दिन साजरा केला. या दिवशी प्रथम, द्वितीय वर्षाचे विद्यार्थी, कर्मचारी आणि पालक या दोघांसाठी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे प्रदर्शन आयोजित केले होते. कार्यक्रमाचे उद्दिष्ट: अंतिम वर्षात विकसित केलेल्या त्यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे प्रदर्शन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा खुलासा करणे असे होते.

या कार्यक्रमात ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तंत्रनिकेतनातील विविध विभागामधील जवळपास १०० विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने भेट दिली. तसेच अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांनी प्रदर्शनाला भेट दिली आणि विद्यार्ध्यांच्या नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील प्रकल्पांचे कौतुक केले. या प्रदर्शनासाठी श्री हर्षल काटदरे, (वरिष्ठ व्यवस्थापक एक्झिक्युशन, परफेक्ट इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल्स) यांना परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी नाविन्यपूर्ण कल्पनेसह सर्व प्रकल्पांचे कौतुक केले आणि राष्ट्रीय विज्ञान दिनाचे आयोजन यशस्वी केल्याबद्दल शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ऑटोमेशन क्षेत्रातील जागतिक नेता म्हणून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना समोर आणणारा हा खरोखरच एक शानदार दिवस होता. विभाग प्रमुख श्रीमती व्ही.ए.जोशी, प्राध्यापक सदस्य आणि शिक्षकेतर कर्मचारी, द्वितीय आणि तृतीय वर्षाचे विद्यार्थी आणि टीम सदस्य यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

**संगणक विभाग प्रकल्प प्रदर्शन अहवाल**

**Techno-Spark-2024**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये, इन्स्टिटयूट इनोव्हेशन कौन्सिल (IIC) अंतर्गत, तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून अंतिम वर्षाचे कॅपस्टोन प्रकल्प प्रदर्शित करून राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रकल्पांसाठी विविध उदयोन्मुख संशोधन विषय निवडले.




प्रकल्प प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रकल्प मॉडेल प्रदर्शित केले. या प्रदर्शनाला प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी, सर्व विभागातील सर्व प्राध्यापकांनी भेट दिली. विद्यार्थ्यांनी प्रकल्पांचे प्रदर्शन केले आणि प्रत्येकाला त्यांच्या प्रकल्पांबद्दल आणि त्यांच्या प्रकल्पांच्या कामाबद्दल डेमो देण्यात आला. विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले. काही पालकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांनी घेतलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी देखील नवीन तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता मिळवली आणि अंतिम वर्षाच्या प्रकल्प कार्याबद्दल आणि ते कसे प्रदर्शित करावे याबद्दल कल्पना मिळवल्या. विशेष अतिथी मिस. सानिका भटये माजी विद्यार्थी संगणक विभाग यांना विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाचे परीक्षण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रकल्प सुधारण्यासाठी, भविष्यातील व्याप्ती लक्षात घेऊन प्रकल्प विकसित करण्यासाठी अतिशय नाविन्यपूर्ण आणि नवीनतम कल्पना दिल्या.

**इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम विभाग**

दृष्टी: गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण सुनिश्चित करणे

विभागीय मिशन: विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीममधील सर्वोत्तम ज्ञानासह सक्षम करणे.

संस्थेची इनोव्हेशन कौन्सिल (IIC) साजरा करत आहे.

## २८ फेब्रुवारी २०२४ – प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा




२८ फेब्रुवारी रोजी डॉ. सी व्ही रामन यांच्या रामन प्रभावाच्या शोधासाठी त्यांचा सन्मान करण्यासाठी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा केला जातो. राष्ट्रीय विज्ञान दिन हा सर्व संशोधक आणि विज्ञानप्रेमींसाठी एक उत्तम दिवस आहे. दरवर्षी २८ फेब्रुवारीला वैज्ञानिक समुदाय 'रामन इफेक्ट'च्या शोधाचा सन्मान करतो. १९८६ मध्ये, भारत सरकारने २८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिवस (NSD) म्हणून नियुक्त केला. या दिवशी सर चंद्रशेखर वेंकट रमण, ज्यांना सीव्ही रमन देखील म्हणतात, यांनी 'रामन इफेक्ट'चा शोध घोषित केला ज्यासाठी त्यांना १९३० मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले होते.

व्हीपीएम पॉलिटेक्निकच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम विभाग आणि आयआयसी सेलच्या वतीने २८ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १:४५ ते ४:४५ या वेळेत EPS विभागाच्या चार लॅबमध्ये प्रोजेक्ट प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

TYEPS च्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात सहभाग घेतला. डॉ. सी व्ही रमण यांच्या सन्मानार्थ विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. या प्रदर्शनाचे प्रमुख पाहुणे अकर सोल्युशन्सचे डिजिटलायझेशन हेड राहुल नायर होते; आयआयटी बॉम्बे प्रकल्प प्रदर्शनात सुवर्णपदक विजेता. तो V.P.M. च्या २०१६ च्या बॅचचा माजी विद्यार्थी आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दुपारी १:४५ वाजता स्वागत सूचनेने झाली आणि विभागप्रमुख श्रीमती आर.यू. पाटील यांनी आपल्या प्रेमळ आणि प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. आणि VPM च्या पॉलिटेक्निक कॉलेजमधील सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी खुले होते. व्हीपीएम पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. डी.के. नायक आणि डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रभारी प्राचार्या, VPM च्या TMC लॉ कॉलेज यांनी प्रदर्शनाला भेट दिली आणि कार्यक्रमाचे स्वागत केले. या प्रदर्शनात ११ संघ सहभागी झाले होते. सहभागी संघांनी त्यांच्या तांत्रिक कल्पना मांडल्या आणि प्रोटोटाइप मॉडेल्सचे प्रात्यक्षिक दिले. एकूण अकरा संघांनी तंत्रज्ञानातील अलीकडील ट्रेंडशी संबंधित विविध प्रकल्प मॉडेल सादर केले आहेत:




स्मार्ट रेसिडेन्सी, स्मार्ट इरिगेशन सिस्टीम, इमर्जन्सी लाइटिंग सिस्टीम, स्मार्ट चार्जिंग हॅझार्ड प्रिव्हेन्शन सिस्टीम, वेस्ट मटेरियल वापरून वीज निर्मिती, पिझोइलेक्ट्रिक इफेक्टद्वारे पवन ऊर्जा, सोलर व्हील चेअर, प्रोग्रामेबल एलसीडी डिस्प्ले, कॅपेसिटर बँक, उच्च वारंवारता असलेले वायरलेस पॉवर ट्रान्समिशन, इन्व्हर्टर.

श्री. नायर यांनी सर्वोत्कृष्ट प्रकल्प म्हणून दोन प्रकल्पांची निवड केली. ठोकळे अभिनव, थोरात कस्तुरी, वर्मा प्रियांशू, रोकडे रितेश यांनी सादर केलेल्या स्मार्ट

चार्जिंग हॅझार्ड प्रिव्हेन्शन सिस्टीम या नावाने एक उत्कृष्ट कार्यान्वित प्रकल्प होता. येलमकर पवन, बोटेकर सुबोध, पठारे भावेश, वाले अब्दुल हादी, पाटील ओंकार यांनी सादर केलेल्या वेस्ट मटेरिअल वापरून वीज निर्मिती नावाच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाची आणखी एक कल्पना होती.

प्रमुख पाहुणे श्री. नायर यांनी प्रभावी प्रकल्प सादरीकरणाच्या कलेमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात उत्कृष्टता सिद्ध केली आहे. त्यांच्या कौशल्याचा केवळ विद्यार्थ्यांनाच फायदा झाला नाही तर अनेकांना महाविद्यालयीन स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रेरित केले आहे. प्रकल्प सादरीकरणासाठी आयआयटी स्पर्धांमध्ये सुवर्णपदक विजेते म्हणून, श्री. राहुलला यशस्वी सादरीकरण करणाऱ्या प्रमुख घटकांची सखोल माहिती आहे. त्याने उदारपणे आपले ज्ञान आणि कौशल्ये आपल्या विद्यार्थ्यांसोबत सामायिक केली आहेत, त्यांना त्यांचे प्रकल्प आत्मविश्वासाने सादर करण्यासाठी आणि स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यास सक्षम केले आहे.

एचओडी मॅडम यांनी श्री राहुल यांचे आभार मानत आणि प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि आमच्या विद्यार्थ्यांना मदत व मार्गदर्शन करणाऱ्या सर्व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून प्रदर्शनाची सांगता झाली.

फोटो आणि व्हिडिओसाठी ड्राइव्ह फोल्डर लिंक: https://drive.google.com/drive/folders/1R5fo4tPXleYmicPN7iyOSi4Lw4lF8jT?usp =sharing

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**३ फेब्रुवारी : राष्ट्रीय परिषद २०२४**

डॉ.व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज तर्फे शनिवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. 'डीस्रपटीव्ह अँड क्रिटिकल थिंकिंग इन बिझनेस' या विषयावर आधारित असलेली ही परिषद प्रज्ञावंत/बुद्धिजीवी, उद्योग तज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांसाठी एक उल्लेखनीय संमेलन ठरले, ज्यामध्ये नवकल्पना, समीक्षणात्मक विचारसरणी आणि व्यत्ययकारी तंत्रज्ञान या विषयावर चर्चा करण्यात आली.

ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांनी व्यवसायातील नावीन्यपूर्णतेच्या महत्त्वाच्या भूमिकेवर भर देत आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात सहभागींचे स्वागत केले. त्यांनी समस्यांना; वाढीच्या/विकासाच्या संधी म्हणून पाहण्याचे आवाहन केले व जोखीम व्यवस्थापन आणि भावनिक बुद्धिमत्तेचा समावेश असलेले निर्णय महत्वाचे आहेत यावर भर दिला. ब्रिम्सचे संस्थापक संचालक, डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, यांनी प्रभावी भाषण केले आणि ब्रिम्सची ची 'थिंक टँक इन क्शन' बनण्याची व नफा, पृथ्वी, लोक आणि शक्ती यावर लक्ष केंद्रित करण्याची वचनबद्धता अधोरेखित केली.

त्यानंतर झालेल्या परिसंवादामध्ये मध्ये रुबरू कन्सल्टिंगचे श्री. मनोज ओक, ए आर आय व्ही लॅब्सचे श्री. चिन्मय सेनगुप्ता, सोमय्या मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या डॉ. अनुजा अग्रवाल आणि तेलवणे पॉवर लिमिटेडचे श्री. राकेश तेलवणे या उद्योग क्षेत्रातील जाणकारांचा समावेश होता. ब्रीम्सच्या सहा. प्रा. डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी परिसंवादाचे सूत्रसंचालन केले. श्री. मनोज ओक यांनी यावर जोर दिला की व्यत्यय हे किंमत युद्ध नसून गुंतवणूक आहे, व आपले नवोपक्रमाचे वैयक्तिक अनुभव सांगितले. श्री. चिन्मय सेनगुप्ता यांनी त्यांच्या स्टार्टअपने AI द्वारे व्यत्यय कसा स्वीकारला याबद्दल चर्चा केली, तर डॉ. अनुजा यांनी त्याच्या वैयक्तिक जीवनात नवकल्पनेच्या विचारसरणीचा उपयोग आणि सितारा विद्यापीठातील वंचित विद्यार्थ्यांना मदत करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास सांगितला. श्री. राकेश तेलवणे यांनी समस्यांचा स्वीकार आणि त्यावर उपाय शोधण्याचे महत्त्व सांगितले.

ब्रिम्स तर्फे प्रकाशित होणाऱ्या 'सृजन' या संशोधन नियतकालिकाचे (संपादकीय समिती सदस्य डॉ. स्मिता जपे आणि डॉ. दिनेश सोनकुल) प्रकाशन अभिनव पद्धतीने करण्यात आले आणि डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी पुढील वर्षीच्या परिषदेचे विषयसूत्र जाहीर केले.




सकाळच्या सत्राचे वैशिष्ट्य म्हणजे परिषदेचे प्रमुख अतिथी आणि वंदे भारत ट्रेन प्रकल्पाचे प्रमुख श्री. सुधांशू मणी यांची उपस्थिती. श्री. मणी यांनी त्यांच्या रेल्वे मधील कारकिर्दीतील अनुभव, विलियम शेक्सपियर यांचे विचार आणि शेर-शायरी पेश करून विस्मयकारक भाषण केले.



परिषद संयोजक डॉ. स्मिता जपे यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने सकाळच्या सत्राची सांगता केली.

सत्राच्या उत्तरार्धात शोधनिबंध सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. डॉ. पंकज त्रिवेदी, डॉ. सुधाकर आगरकर आणि डॉ. रमेश नायर यांनी परीक्षण केले. तसेच डॉ.विभूती सावे यांनी आयोजित केलेल्या नाविन्यता विषयावरील भित्तिपत्रक तयार करण्याच्या स्पर्धेत विविध संस्थांमधील विद्यार्थ्यांनी त्यांच्या सर्जनशील आणि नावीन्यपूर्ण कल्पना प्रदर्शित केल्या.

परिषदेच्या समन्वयक डॉ. कांचन अक्षय यांनी आयोजित केलेल्या समारोप कार्यक्रमात, संशोधक आणि विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट योगदानाची दखल घेऊन पारितोषिक वितरणाने परिषदेचीची सांगता झाली.

६ फेब्रुवारी : एडीसी तर्फे डॉ. श्रीपाद बापट, यांनी ब्रीम्स टीमच्या केतकी मिस्त्री व श्री चैतन्य पवार यांच्या सहकार्याने डॉ. नीतिन जोशी यांच्या सेलिंग मेड इंटरेस्टिंगया विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केले. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स, आय टी आय - ठाणे, वि प्र म. चे पॉलिटेक्निक आणि डॉ. व्ही. एन. ब्रिम्स, ठाणे अशा विविध महाविद्यालयातील एकूण ३५ विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले. डॉ. नीतिन जोशी यांनी अतिशय प्रभावीपणे विद्यार्थ्यांना संबोधित केले, त्यांनी सेलिंगची मूलभूत तत्त्वे सांगितली आणि या वस्तुस्थितीवर भर दिला की विक्री व्यवसायात ऊर्जा, कृती, उत्कटता आणि वचनबद्धता या सर्व गोष्टी व्यवसाय यशस्वी करण्यासाठीची मुख्य वैशिष्ट्ये आहेत.



६ फेब्रुवारी : दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या ग्रंथालयातर्फे श्री. संजय सपकाळ यांना 'कोहा' या जागतिक दर्जाच्या ग्रंथालय संगणक प्रणालीवरील एकदिवसीय कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले. विद्यापीठाने त्याच्या संलग्न महाविद्यालयांमध्ये कोहा ओपन सोर्स ग्रंथालय प्रणाली वापरण्यास सुरुवात केली आहे.

दापोलीच्या कॉलेज ऑफ फॉरेस्ट्री, कॉलेज ऑफ ग्रिकल्चरल इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ हॉर्टिकल्चर व कॉलेज ऑफ फिशरीज, शिरगाव, कॉलेज ऑफ हॉर्टिकल्चर, मुळादे आणि पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, किल्ला-रोहा, रायगड अशा विद्यापीठातील विविध महाविद्यालयांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. या कार्यशाळेत या सर्व महाविद्यालयांचे ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचारी सहभागी झाले होते.



८ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी डॉ. विभूती सावे यांच्यासह व्हीपीएमच्या विविध संस्थांच्या विद्यार्थ्यांसाठी 'निरीक्षण कौशल्ये विकसन' या विषयावर एक सत्र घेतले.




११ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी हिरानंदानी हाफ मॅरेथॉनमध्ये भाग घेतला आणि २ तास १४ मिनिटांत २१ किलोमीटरचे अंतर यशस्वीरित्या पार केले.

१५ फेब्रुवारी : ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी संघबांधणी क्षमता, नेतृत्व कौशल्ये, खिलाडू वृत्ती विकसित करणे या उद्देशाने वि.प्र.म. च्या हिरवळीवर (टर्फ) वर क्रिकेट स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण १० संघ सहभागी झाले.

निकाल: विजेता: वशिष्ट संघ - प्रथम वर्ष
उपविजेता: चाणक्य संघ - प्रथम वर्ष



१६ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी विवेकानंद इन्स्टिट्यूट चेंबूर येथे प्राध्यापक निवड प्रक्रियेसाठी कुलगुरू नामनिर्देशित सदस्य म्हणून भेट दिली.

१६ फेब्रुवारी : डॉ. कांचन यांनी डॉ. व्ही. एन. ब्रिम्स आणि रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी, ठाणे तर्फे विद्यार्थ्यांसाठी 'ए आय : द नोन एविल' या विषयसूत्रावर आधारित Rotary Youth Leadership Awards - RYLA या कार्यक्रमाचे आयोजन केले.

१७ फेब्रुवारी : श्री. संजय सपकाळ यांना, आसनगाव येथील शिवाजीराव एस. जोंधळे इन्स्टिट्यूट ऑफ लॉ अँड रिसर्च येथे डिजिटल युगातील ग्रंथपालांसाठीची कौशल्ये या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेत व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. त्यांनी या कार्यशाळेत कोहा ओपन सोर्स लायब्ररी मॅनेजमेंट सॉफ्टवेअर वापरून लायब्ररी वेब पेज कसे विकसित करावे आणि डी स्पेस सॉफ्टवेअरचा वापर करून संस्थात्मक डिजिटल रिपॉझिटरी कशी तयार करावी या संबंधी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला शिवाजीराव एस. जोंधळे आसनगाव प्रांगणातील; कॉलेज ऑफ फार्मसी, कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स ॲण्ड रिसर्च, इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्सच्या मधील ग्रंथालय कर्मचारी उपस्थित होते.




२० फेब्रुवारी : प्रा. सिद्धेश सोमण ; एसपी जैन स्कूल ऑफ ग्लोबल मॅनेजमेंट, मुंबई येथे आयोजित डॉ. अँजेलिना प्रमोवा यांच्या 'अनलॉकिंग कॅपिटल मार्केट्स, बँकिंग अँड फायनान्सिंग अपॉर्च्युनिटीज फॉर इंडियन कॉर्पोरेट्स इन लक्समबर्ग अँड स्वित्झर्लंड' या विषयावरील अभ्यासपूर्ण सत्राला उपस्थित राहिले.

२२ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन २०२४ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २१ फेब्रुवारी रोजी या दिवसाच्या निमित्ताने समिती तर्फे विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत या वर्षीच्या विषयसूत्रावर आधारित लेखन सादर करण्याचे आवाहन करण्यात आले ; जे त्यांच्या मातृभाषेचे सौंदर्य आणि समृद्ध वारसा दर्शविते आणि त्यावर आधारित एक कार्यक्रम आयोजित केला गेला, ज्यामध्ये या वर्षीच्या बहुभाषिक शिक्षण – शिक्षणाचा आधारस्तंभ आणि आंतर पिढी शिक्षण या युनेस्कोने जाहीर केलेल्या विषयसूत्राचे महत्त्व दर्शविणारे दृष्टिकोन, मातृभाषेतील कविता, भाषेतील शब्दांची निर्मिती सादरीकरणे करण्यात आली.



डॉ. महेश पाटील (उपप्राचार्य – विप्रम चे जोशी बेडेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय) हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले आणि सध्याच्या प्रसिद्ध आणि महत्त्वाच्या अशा सोशल मीडिया क्षेत्रातील मातृभाषा आणि बहुभाषिकतेचे महत्त्व विशद केले.

२२ फेब्रुवारी : डॉ. पंकज नांदूरकर यांना ठाकूर पॉलिटेक्निकतर्फे FIESTA या नवोदित उद्योजकांसाठी आयोजित कार्यक्रमासाठी तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले, त्यामध्ये 'प्रॉब्लेम सोल्यूशन फिट अँड प्रॉडक्ट-मार्केट फिट' या विषयावर त्यांचे एक सत्र आयोजित करण्यात आले.



२३ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांना आयईएस व्यवस्थापन संस्थेतर्फे त्यांच्या परिषदेसाठी शोधनिबंधांचे परिक्षण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

२६ फेब्रुवारी : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी लिहिलेला केस स्टडी; आय आय एम – रोहटक (IIM -Rohtak) च्या UGC CARE अनुक्रमित 'इमर्जिंग इकॉनॉमीज केस जर्नल' – सेज (SAGE) जर्नल्स प्रकाशीत नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाली.

२९ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रिम्स ग्रंथालय तर्फे, ग्रंथालयाच्या वाचन कक्षामध्ये २९ फेब्रुवारी २०२४ ते १ मार्च २०२४ या कालावधीत 'नेतृत्व' या विषयसूत्रावर आधारित मासिक पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन द्वितीय वर्ष एमएमएसचे वरीष्ठ तुकडीचे विद्यार्थी आणि ग्रंथालय समितीचे विद्यार्थी सदस्य श्री. मिलिंद सावर्डेकर यांनी केले.

संचालक डॉ. नीतिन जोशी, प्राध्यापक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी या प्रदर्शनाला उत्साहाने भेट दिली आणि संग्रह पाहिला.



२९ फेब्रुवारी : चेतना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये संचालक निवडीसाठी डॉ. नीतिन जोशी यांनी कुलगुरू नामनिर्देशित सदस्य म्हणून भेट दिली.

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.